## खा. राघव चड्ढा यांच्यावर भाजपकडून मोठी जबाबदारी



**नवी दिल्ली :** राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा यांना भाजपने मोठी जबाबदारी दिली आहे. राज्यसभेच्या अधिसूचनेनुसार राघव चड्ढा यांची याचिका समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यात १० सदस्यांचा समावेश आहे. काही दिवसांपूर्वीच राघव चड्ढा यांच्यासह ७ खासदारांनी आम आदमी पक्षाची साथ सोडत भाजपमध्ये प्रवेश केला होता. या सातही खासदारांनी २७ एप्रिल रोजी अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला होता. यामुळे राज्यसभेत १० खासदार असलेल्या आम आदमी पक्षाकडे आता केवळ ३ खासदार उरले. समितीचे पुनर्गठन करत सभागृहातील १० सदस्यांची या पॅनेलसाठी नियुक्ती करण्यात आली. यात राघव चड्ढा यांसह हर्ष महाजन, गुलाम अली, शंभू शरण पटेल, मयंककुमार नायक, मस्तान राव यादव बीधा, जेबी माथेर हिशाम, सुभाशीष खुंटिया, रंगव्रा नारझारी आणि संतोश कुमार पी. यांचा समावेश आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३०५

www.ramprahar.com

◆ रविवार, २४ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


मोरा-भाऊचा धक्का सागरी प्रवास महागला/२

वनमंत्र्यांच्या भूमिकेचे पर्यावरणप्रेमींकडून स्वागत/६

रायगड क्रिकेट संघासाठी आरडीसीएचा टॅलेंट हंट/८


# भारतीय लष्कराचे सामर्थ्य वाढणार

## शिर्डीत क्षेपणास्त्र संकुल, तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

युद्ध कोणत्याही देशाला परवडणारे नाही. त्यामुळे युद्धापेक्षा शांततेत मार्ग काढण्याचा पर्याय नेहमीच चांगला आहे. तरीही स्वसंरक्षणासाठी सज्ज राहणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपल्याकडे अपेक्षित दारूगोळा असणे आवश्यक आहे. भारतात दारूगोळ्याचा अमाप साठा आहे. भारत आता इतर देशांत शस्त्रास्त्रे निर्यात करतो. सीमेवर वर्षभर युद्ध सुरू राहिले तरी तितका दारूगोळा तयार करण्याचे सामर्थ्यही भारताकडे आहे. सीमेवरील युद्धासाठी भारत सज्ज आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २३) दिली. शिर्डीत क्षेपणास्त्र संकुल, तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा



शनिवारी पार पडला. या कार्यक्रमाला केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी फडणवीस बोलत होते.

३०० किमी मारा करणारी क्षेपणास्त्रे, वर्षभर दारूगोळा, ड्रोन आदी युद्धविषयक सामुग्रीने भारत आता आत्मनिर्भर होण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. हे आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया या दोन्हींचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या ठिकाणी जगातील सर्वात आधुनिक यंत्रसामग्री लागलेली आहे. त्यातून भारतासाठी आणि जगाकरिता शस्त्रास्त्रांची निर्मिती होत आहे. येथील क्षमता जगाला थक्क करेल. तसेच मोठ्या प्रमाणात निर्यातही केली जाणार आहे. त्यामुळे आत्मनिर्भरताही आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला दोन संदेश दिले होते. पहिला म्हणजे मेक इन इंडिया आणि दुसरा होता आत्मनिर्भर भारत. स्वत:करताही भारत बनवेल आणि जगाकरतादेखील भारत बनवेल, असा संदेश मोदींनी दिला होता. मोदींच्या नेतृत्वात संरक्षण क्षेत्रात हा संदेश अमलात आणण्याची जबाबदारी आपल्या देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी स्वीकारली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

शिर्डीच्या एमआयडीसी परिसरात २०० एकर जागेवर उभारण्यात आलेल्या भव्य क्षेपणास्त्र संकुल आणि तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व विधान परिषद सभापती राम शिंदे उपस्थित होते. या सोहळ्यात उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज आपण पाहतोय, जो देश सगळी शस्त्रास्त्रे आयात करत होता, आयातीत गोष्टींच्या भरोशावर लढत होता, आज तोच देश मोठ्या प्रमाणात संरक्षण क्षेत्रातला निर्यातदार बनला आहे. आत्मनिर्भर भारतच्या अंतर्गत आता जगातील चांगल्यात चांगले ड्रोन, मिसाईल हे आपण आपल्याकडे तयार करीत आहोत. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न आज पूर्ण होताना दिसत आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# वरुणराजा एक्स्प्रेस पाच दिवस आधीच केरळात

## महाराष्ट्रात जूनच्या पहिल्या आठवड्यात कोसळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उन्हाच्या झळा आणि घामाच्या धारांनी हैराण झालेल्या देशवासीयांना लवकरच दिलासा मिळणार आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच भारतात दाखल होण्याचा अधिकृत अंदाज वर्तवला आहे. ताज्या माहितीनुसार मान्सून २६ मेपर्यंत केरळच्या किनारपट्टीवर धडकण्याची दाट शक्यता आहे. या अंदाजात चार दिवसांची तफावत गृहीत धरण्यात आली आहे, म्हणजेच २४ ते ३० मेदरम्यान केव्हाही मान्सूनचे केरळात आगमन होऊ शकते.

आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार नैऋत्य मान्सूनने आधीच अंदमान आणि निकोबार बेटे, दक्षिण अरबी समुद्र, बंगालच्या उपसागराचा नैऋत्य आणि आग्नेय भाग व्यापला आहे. सध्या मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू असून हवामानाची परिस्थिती अनुकूल राहिल्यास तो नियोजित तारखेपेक्षा ५ दिवस आधीच केरळात पोहचेल. साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळमध्ये दाखल होतो. गेल्या वर्षी २४ मे रोजी मान्सूनचे आगमन झाले होते. केरळमध्ये पाऊस सुरू झाल्यानंतर साधारणपणे ८ ते १० दिवसांत मान्सून महाराष्ट्रात दाखल होतो. त्यानुसार यंदा ५ ते ७ जूनदरम्यान मान्सून कोकणात, मुंबईसह महाराष्ट्रात सक्रिय होण्याची शक्यता आहे.

सध्या कोकण किनारपट्टीवर पूर्व-मान्सूनच्या सरी सुरू असून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात



मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेळेपूर्वी पाऊस सुरू झाल्याने खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला गती मिळेल. पेरण्यांचे नियोजन लवकर करता येईल. देशातील प्रमुख धरणांमधील खालावलेली पाणी पातळी सुधारण्यास मदत होईल.

हवामान खात्याने सांगितले की, पुढील ४८ तासांत अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनसाठी पोषक परिस्थिती निर्माण होत आहे. युरोपियन सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्टनेही मेच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून भारतात दाखल होण्याचा अंदाज वर्तवला आहे. आयएमडी मान्सूनच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून असून लवकरच पुढील अपडेट जाहीर करेल. सध्या देशात एकाच वेळी दोन पश्चिमी विक्षोभ सक्रिय असल्याने १७ राज्यांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रातही पुढील ५ दिवस कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

**घनदाट जंगलात जवानांची कारवाई**

**गडचिरोली : वृत्तसंस्था**

ऑपरेशन अंतिम प्रहार अंतर्गत जिल्हा माओवादमुक्त केल्यानंतर नांग्या टाकलेल्या आत्मसमर्पित माओवाद्यांनी दिलेल्या गोपनीय माहितीच्या आधारे जवानांनी शनिवारी (दि. २३) बिनागुंडाच्या घनदाट जंगलातील शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईमुळे माओवाद्यांचे मनसुबे उधळून लावण्यात जवानांना यश आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार १६ मे रोजी शेवटच्या पाच जहाल माओवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले होते. या माओवाद्यांची कसून चौकशी करण्यात आली. यावेळी त्यांनी बिनागुंडा ठाणे हद्दीतील घनदाट जंगल परिसरात शस्त्र बनवण्याचा कारखाना आणि इतर घातक साहित्य जमिनीत गाडून ठेवल्याची कबुली दिली होती. पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी वेळ न दवडता सूत्रे हलवली. ६० जवान व प्राणहिता मुख्यालयातील जवान यांच्या संयुक्त ६ तुकड्या तसेच बॉम्बशोधक व नाशक पथकाच्या २ तुकड्यांना या दुर्गम भागात शोधमोहिमेसाठी रवाना करण्यात आले होते.

## आमरस प्यायल्याने एकाच कुटुंबातील सात जणांना विषबाधा

**अहिल्यानगर :** मुंबईत गेल्या महिन्यात एकाच कुटुंबात चार जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. कलिंगड आणि बिर्याणी खाल्ल्यानंतर चौघांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली होती. अखेर विषबाधा झाल्यानेच हा मृत्यू झाल्याचे पोलीस व फॉरेन्सिक तपासातून समोर आले. आता अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगावला जायभाय कुटुंबातील सात जणांना आंब्याचा रस पिल्यानंतर विषबाधा झाल्याची घटना उघडकीस आली. सर्वांची प्रकृती बिघडल्याने अहिल्यानगर शहरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. सात रुग्णांपैकी सहा जणांना वेगवेगळ्या दिवशी डिस्चार्ज देण्यात आला असून एकावर अजूनही उपचार सुरू आहेत.

## चीनमधील कोळसा खाणीत भीषण स्फोट; ९० कामगारांचा मृत्यू

**बीजिंग :** चीनच्या उत्तर भागातील शांक्सी येथील एका कोळसा खाणीत भीषण गॅस स्फोट झाल्याचे वृत्त आहे. या स्फोटात किमान ९० कामगारांचा मृत्यू झाल्याचे समजते. २००९ नंतरचा हा चीनमधील सर्वात मोठा आणि भीषण खाण अपघात मानला जात आहे. सरकारी मीडिया 'शिन्हुआ'ने दिलेल्या माहितीनुसार हा अपघात शुक्रवारी रात्री उशिरा किनयुआन काउंटीच्या लिउशेन्यू कोळसा खाणीत घडला. स्फोट झाला तेव्हा खाणीत २४७ मजूर काम करीत होते. किचाचा या कॉर्पोरेट डेटा बेसच्या माहितीनुसार या खाणीचे संचालन 'शांक्सी टोंगझोउ ग्रुप लिउशेन्यू कोल इंडस्ट्री' करते. या कंपनीची स्थापना २०१० मध्ये झाली असून, 'शांक्सी टोंगझोउ कोल कोकिंग ग्रुप' चे कंपनीवर नियंत्रण आहे. शांक्सी प्रांत हा चीनमधील सर्वात मोठा कोळसा खाण क्षेत्र म्हणून ओळखला जातो.

## निवडक

### राज्यातील शाळा उशिरा सुरू होणार? मंत्र्यांनी दिले संकेत

**नागपूर :** राज्यात तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून राज्य सरकार शाळा सुरू होण्याची तारीख पुढे ढकलण्याचा गंभीरपणे विचार करत आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी शनिवारी (दि. २३) नागपुरात माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. १५ जूनपर्यंत उष्णतेची दाहकता अशीच राहिल्यास १५ जूननंतर शाळा सुरू करण्याचा विचार करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींना आगामी काळात अमेरिका भेटीचे निमंत्रण

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो हे चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. त्यांनी शनिवारी (दि. २३) नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या वेळी झालेल्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत मार्को रुबियो यांनी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आगामी काळात अमेरिकेला भेट देण्यासाठी आणि 'व्हाईट हाऊस'मध्ये येण्याचे अधिकृत निमंत्रण दिले आहे.

## मुंबई विमानतळावर ११.२५ कोटींचे कोकेन जप्त

### शरीरामध्ये लपवून ड्रग्जची तस्करी, चौघांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

अमली पदार्थ तस्करीविरुद्धच्या एका मोठ्या कारवाईत महसूल गुप्तचर संचालनालयाच्या मुंबई विभागीय पथकाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर नुकत्याच दोन वेगवेगळ्या कारवाया केल्या. या कारवायांमध्ये अंदाजे ११.२५ कोटी मूल्य असलेले २.२५ किलोग्रॅम कोकेन जप्त केले आहे. शरीरामध्ये लपवून ड्रग्जची तस्करी करणाऱ्या चार परदेशी नागरिकांना या कारवाईदरम्यान ताब्यात घेण्यात आले आहे.

गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत २२ मे रोजी डीआरआय अधिकाऱ्यांनी अदीस अबाबा येथून मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलेल्या एक महिला व एक पुरुष प्रवाशाला ताब्यात घेतले. चौकशीनंतर त्यांनी तस्करीसाठी अमली पदार्थ असलेल्या कॅप्सूल गिळल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ८४ कॅप्सूल हस्तगत



करण्यात आल्या. अवैध बाजारात ७ कोटी रुपये किंमत असलेले १.४० किलोग्रॅम कोकेन आढळून आले. याआधीच्या कारवाईत डीआरआय अधिकाऱ्यांनी अदीस अबाबा येथून मुंबई विमानतळावर आलेल्या एका आफ्रिकन पुरुष व एका आफ्रिकन महिलेला ताब्यात घेतले होते. दोन्ही प्रवाशांनी अमली पदार्थ असलेल्या कॅप्सूल गिळल्याची कबुली दिली. त्यांच्या शरीरातून ६३ कॅप्सूल बाहेर काढण्यात आल्या. त्याची किंमत ४.२५ कोटी रुपये आहे.

# स्वस्त सोने पडले महागात!

## म्हसळ्यात १५ लाखांची फसवणूक, राजस्थानची टोळी जाळ्यात

**म्हसळा : प्रतिनिधी**

स्वस्तात सोने मिळवण्याच्या आमिषाने म्हसळा तालुक्यातील एका नामांकित व्यापाऱ्याला तब्बल १५ लाख रुपयांचा गंडा घालणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा म्हसळा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी राजस्थानमधील पाच आरोपींना अटक करण्यात आली असून बनावट दागिन्यांचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. या धाडसी कारवाईमुळे तालुक्यात खळबळ उडाली असून पोलिसांच्या शिताफीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

१५ मे रोजी आरोपींनी फिर्यादी व्यापाऱ्याला कमी दरात खरे सोन्याचे दागिने विक्रीस असल्याचे सांगून विश्वास संपादन केला. १५ लाख रुपये घेऊन आरोपींनी बनावट दागिने फिर्यादीच्या हाती दिले आणि



पसार झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच व्यापाऱ्याने म्हसळा पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा रजी. क्रमांक ७५/२०२६ अन्वये भारतीय न्यायसंहिता २०२३चे कलम ३१८(२), ३१८(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. आरोपी किल्ला, ता. रोहा येथे असल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचून २२ मे रोजी रात्री पाचही आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये केसाराम बागरी (४७), मोहनलाल परमार (४२), राजू राठोड (२७), अनिल परमार (२६) आणि जितेंद्रकुमार परमार (२७) यांचा समावेश आहे. हे सर्व मूळचे राजस्थानच्या जालोर जिल्ह्यातील रहिवासी असून त्यातील काहीजण रोहा तालुक्यात वास्तव्यास होते. ही कारवाई पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच श्रीवर्धन विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# हायस्पीड बुलेट ट्रेनच्या कामाला वेग

### घणसोलीत टनेल बोरिंग मशीनचे महाकाय कटरहेड

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे स्वप्न असलेल्या मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल (बुलेट ट्रेन) प्रकल्पाने आता अधिक गती घेतली आहे. या महाकाय प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक टप्पा म्हणजे मुंबईत उभारला जाणारा २१ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग. समुद्राच्या आणि जमिनीच्या खालून जाणाऱ्या या मार्गाच्या निर्मितीसाठी नवी मुंबईतील सावली (घणसोली) येथे दुसऱ्या 'टनेल बोरिंग मशीन'चे महाकाय कटरहेड अत्यंत यशस्वीपणे जमिनीखाली उतरवण्यात आले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे अवघ्या काही दिवसांपूर्वीच



विक्रोळी येथे पहिल्या टीबीएमचे कटरहेड स्थापित करण्यात आले होते. पाठोपाठ घणसोलीतील ही दुसरी महत्त्वाची तांत्रिक प्रक्रिया पार पडल्याने बुलेट ट्रेनचे काम नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या दिशेने अतिशय वेगाने सुरू असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

हा जमिनीखालील भुयारी मार्ग कसा साकारला जाणार याबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली. घणसोली येथील सावलीतून हे दुसरे टीबीएम मशीन आपली खोदाई सुरू करेल व जमिनीखालून विक्रोळीच्या दिशेने मार्गक्रमण करेल. कटरहेड जमिनीखाली उतरवल्यानंतर आता या दोन्ही मशिन्सची संपूर्ण जोडणी पूर्ण केली जाईल. त्यानंतर सुरक्षेच्या आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यांच्या चाचण्या घेतल्या जातील. यानंतर जुलै २०२६ च्या पहिल्या आठवड्यात प्रत्यक्ष भुयार खोदण्याच्या मुख्य कामाला सुरुवात होईल.

या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्राचा आकार खऱ्या अर्थाने थक्क करणारा आहे. या कटरहेडचा व्यास तब्बल १३.६ मीटर एवढा अवाढव्य असून त्याचे वजन सुमारे ३५० टनांच्या घरात आहे. टीबीएमच्या पुढील भागातील मुख्य शील्डचा हा सर्वात कळीचा आणि महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. तंत्रज्ञानाचा हा असा एक अद्भुत नमुना आहे, ज्याद्वारे एकच सलग आणि अतिविशाल बोगदा खोदला जाणार आहे. एकाच बोगद्याची रुंदी इतकी मोठी असेल की त्यातून बुलेट ट्रेनच्या येण्याच्या आणि जाण्याच्या अशा दोन्ही ट्रॅक्सची उभारणी एकाचवेळी करणे शक्य होणार आहे.

## पेट्रोल-डिझेल, सीएनजीच्या दरात वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे शनिवारी (दि. २३) देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

दरम्यान, शनिवारपासून पेट्रोल ८७ पैशांनी, तर डिझेल ९१ पैशांनी महागले आहे. १० दिवसांतील ही तिसरी दरवाढ आहे, तर दुसरीकडे दिल्ली-एनसीआरमध्ये कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) च्या दरातही प्रतिकिलो १ रुपयाने वाढ करण्यात आली असून, मागील काही दिवसांतील ही तिसरी दरवाढ आहे. दरम्यान, दरवाढीनंतर दिल्लीत सीएनजीचा दर ८१.०९ रुपये प्रतिकिलो असा असेल.

# पनवेलमध्ये मंगळवारी "एक कृतार्थ संध्याकाळ"

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्या वतीने कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त "एक कृतार्थ संध्याकाळ" या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवारी (दि. २६) सायंकाळी ५.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमात "लोकनेता" या प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन, निमंत्रितांचे कविसंमेलन तसेच अभीष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगमंत्री उदय सामंत, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधू मंगेश कर्णिक, लोकनेते रामशेठ ठाकूर, पानिपतकार ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ज्येष्ठ कवी व चित्रपट निर्माते दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर, कोमसापचे कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर, सुप्रसिद्ध गझलकार ए. के. शेख, कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त प्रा. एल. बी. पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कोमसापचे गणेश कोळी आणि संजय गुंजाळ यांनी केले आहे.

# मानसिक आरोग्य सेवा बळकट होणार-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण



प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण व संशोधनालाही चालना मिळणार आहे.

**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहेः एम.डी. सायकिअॅट्री ,एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी,एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क,डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागपूर येथे एम.डी. सायकिअॅट्रीला सुरुवात प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

**नर्सिंग क्षेत्रातही प्रगती**

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना दर्जेदार व विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन व नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा विस्तार.

मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

# गतवर्षीच्या तुलनेत मुरुडमध्ये पर्यटक संख्या कमीच!



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुड शहरात सध्या पारा सकाळी ३६ अंश सेल्सिअस असतो. सकाळपासून गरम वातावरण असल्याने समुद्राच्या गार पाण्यात कुल कुल होण्यासाठी पर्यटक मुरुडला उन्हाळी सुट्टी मुरुडला एन्जॉय करण्यासाठी आले आहेत. गेली २ दिवस अतिशय गरम असल्याने पर्यटक वातानुकूलित रूममधून बाहेर पडत नाहीत. त्यामुळे प्रचंड तापमानामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत पर्यटकांची संख्या कमीच आहे.

राज्यात सर्वत्र परीक्षांचे निकाल लागले. सुट्टी जाहीर झाल्याने कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे पर्यटकांनी धाव घेतली आहे. पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी आहे. सुट्टी लागून आलेल्या वीकएण्डमुळे

## उन्हाळ्याचा परिणाम

पर्यटनप्रेमींना मोठा लाभ झाला असून, मुरुड शहरात सायंकाळी अल्हाददायक व सुंदर वातावरण आहे. समुद्र हळूहळू उसळू लागला असल्याने मासेमारी धोक्यात आहे. माशांची अवाक घटल्याने पर्यटकांना महाग मासे घ्यावे लागत आहेत. मुरुडला आलो आणि मासे खाल्ले नाही तर मन राहत नाही. महाग असले तरी मासे खाणार अशी पर्यटकांची धारणा आहे.

पर्यटक मुरुड समुद्रकिनारी असलेली वातानुकूलित हॉटेलला पहिली पसंती देत आहेत. मुरुडचा पारा ३८ वर गेल्याने मुंबई-पुणे येथील पर्यटक लहान मुलांसाठी वातानुकूलित हॉटेल बुक करत आहेत. मासळी कमी असल्याने पर्यटक किनाऱ्यावरील, नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टोलवर, पाणीपुरी, भेळ पुरी अशा विविध पदार्थांची चव घेत आहेत.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेली विश्रामधाम बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ येणाऱ्या पर्यटकांना होणार आहे. पालिकेचे कर्मचारी समुद्रकिनारी दिवसातून ३ वेळा स्वच्छ करतात. मुरुडला असणारे जलदुर्ग जंजिरा व पद्मदुर्ग पर्यटकांसाठी सज्ज झालेत. मुरुडपासून जवळच असणारे गारंबी धारण, कुडे मांदाड लेणी, खोकरी, दत्तमंदिर या पर्यटन स्थळावर स्वच्छता करून खाण्या पिण्याचे स्टॉल करण्यात आलेत. सलग सुट्टी असल्याने पर्यटकांची संख्या वाढत आहे. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत पर्यटक कमी आहेत.

# मोरा-भाऊचा धक्का सागरी प्रवास महागला

## पावसाळी हंगामासाठी २५ रुपयांची वाढ



**उरण : रामप्रहर वृत्त**

मोरा ते भाऊचा धक्का (मुंबई) या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतुकीच्या तिकीट दरात मंगळवार, २६ मे पासून २५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळी हंगामाचे कारण देत ही दरवाढ करण्यात आल्याने नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने या पावसाळी हंगामासाठी नवीन तिकीट दर जाहीर केले आहेत. त्यानुसार, प्रौढांच्या पूर्ण तिकिटाचे दर ८० रुपयांवरून थेट १०५ रुपये करण्यात आले आहेत, म्हणजेच यामध्ये २५ रुपयांची वाढ झाली आहे. तर लहान मुलांच्या (हाफ तिकीट) दरात ३९ रुपयांवरून ५३ रुपयांपर्यंत म्हणजेच १४ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही नवीन दरवाढ २६ मे पासून ते ३१ ऑगस्टपर्यंत लागू राहणार असल्याची माहिती मोरा बंदर निरीक्षकांनी दिली आहे.

दरवर्षी पावसाळी हंगामाचे कारण पुढे करून या मार्गावर २० ते २५ रुपयांची दरवाढ केली जाते. मात्र, पावसाळा संपल्यानंतर उन्हाळी हंगामातही ही वाढलेली किंमत कमी केली जात नाही, ती तशीच कायम ठेवली जाते. त्यानंतर पुढच्या पावसाळ्यात पुन्हा त्यात नवीन दरवाढ केली जाते,

प्रशासनाच्या या भूमिकेमुळे आणि सातत्याने होणाऱ्या दरवाढीमुळे नियमित प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सध्या पावसाळा तोंडावर आहे. त्या काळात अन्य जलवाहतूक सेवा बंद ठेवली जातात. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून मोरा ते भाऊचा धक्का ही जलसेवा मात्र पावसाळ्यातही सुरू ठेवली जाते.

# रोहा बसस्थानकाच्या आवारात दुकानधारकांचे अतिक्रमण

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा बस स्थानकात असलेल्या दुकानधारकांनी बस स्थानकातील परिसरावर अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रवाशांना बसस्थानकात वावरताना अडचणी निर्माण होत आहेत.

खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून कोकणातील पहिले खाजगीकरणातून बांधलेले रोहा बस स्थानक सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याचे दिसून येत आहे. या बस स्थानकात व्यापारी गाळे असून या काळात व्यापाऱ्याने अनेक व्यवसाय थाटले आहेत परंतु यातील काही व्यापाऱ्यांनी रोहा कोलाड मार्गाच्या दिशेकडे असलेल्या आपल्या

## प्रवाशांना चालण्यास अडथळे



दुकानासमोर फुटपाथ मोठा केला आहे.यावर बिनधास्तपणे आपले सामान ठेवत असून यासाठी त्यांनी बांधकाम करून ती जागा मोठी केली आहे. काही दुकानधारकांनी रोहा कोलाड मार्गावरील गटार सुद्धा आपला ताब्यात घेतल्याचे दिसून येते.

बस स्थानकाच्या आवारात एक खाद्यपदार्थाचा दुकानधारक वडे, भजी करण्याचे स्टॉल चक्क प्रवासी ये-जा करण्याच्या मार्गावर बाहेर काढून नेहमीच व्यवसाय करत आहेत. ही प्रचंड धोकादायक बाब असून यावर कोणाचेही लक्ष का जात नाही हा मोठा प्रश्न समोर येत आहे. या ठिकाणी पदार्थ तळत असताना गरम तेलाचे थेंब प्रवासाच्या अंगार उडत असल्याचे दिसून आले आहे. तर दुसरीकडे याच दुकानाच्या समोर चहाची टपरी टाकल्याचे दिसून येते.

या ठिकाणी तयार होणारे खराब दुग्धजन्य पदार्थ कुठे टाकला जातो हा प्रश्न समोर आहेच. परंतु या लगत असलेल्या गटातून अनेकदा दुर्गंधीचा वास येत असल्याचे दिसून येते. गटारावर या व्यापाऱ्याने बांधकाम केल्याने नगरपालिकेला हे गटार साफ करताना अनेक अडचणी येतात. या दुकानदारकांना कोणाचे अभय आहे असा सवाल ही विचारला जात आहे महत्त्वाचे म्हणजे रोहा एसटी आगार व रोहा नगरपालिका या व्यापार्यावर कारवाई करणार का असा सवाल विचारला जात आहे.

रोहा बस स्थानकाच्या आवारात बस बाहेर येत असलेल्या ठिकाणी अनेकदा खाजगी चार चाकी वाहने उभी राहत असल्याचे दिसून येते. बस बाहेर काढताना अनेक वेळा चालकाला कसरत करावी लागत आहे. अनेकदा खाजगी चार चाकी व बस चालकांमध्ये वादावादी होता दिसत आहे.

स्वच्छ रहा सुंदर व्हा अशी संकल्पना रोहा नगर परिषदेच्यावतीने राबवण्यात येत असताना हे गाळेधारक मात्र काही वेळा कचरा रस्त्यावर टाकताना दिसत आहेत.

# आपटा गावाच्या विकासासाठी आता 'टाटा मोटर'चा सहभाग

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावाच्या विकासासाठी व गावातील स्वच्छता आरोग्य पाणीपुरवठा महिला विकास अंगणवाडी व इतर काही खास बाबीसाठी टाटा मोटर्सनी आता आपटा गावाच्या विकासासाठी आपला सी एस आर फंडातून हातभार लावण्यात निर्णय घेतला आहे

याबाबत नुकतीच गावात मिटींग झाली याच्यामध्ये २६ ग्रामस्थांना निवडले असून प्रत्येक आळीमधून आता एक एक



समिती निवडून गावातील कोणत्या विकास कामाला प्राधान्य द्यायचे हे ठरविण्यात येणार आहे

याबाबत टाटा मोटर्स सीआर एस फंडाच्या प्रतिनिधी अश्विनी शेळके यांनी गावातील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले यावेळेला सरपंच व ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थ या मीटिंगला हजर होते ग्रामस्थांनी सांगितले की गावाच्या विकासासाठी आम्हाला पहिले सोलर पॉवर ची मदत हवी आहे जी आमच्या गावाच्या पाणीपुरीसाठी गरजेचे आहे व हे काम लवकर व्हावे प्राधान्यने व्हावे असेटाटा मोटर्सच्या प्रतिनिधी अश्विनी शेळके यांना विनंती केली आहे टाटा मोटर्सची गावाला आता गावासाठी दरवर्षी पुढील काही वर्षे मदत करणार आहे असे त्यांच्या प्रतिनिधींनी सांगितले आहे व

आपटा विकासासाठी स्वच्छता आरोग्य व इतर चांगल्या कामासाठी हा फंड वापरण्यात येणार आहे याबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले सदर मिटीग च्या वेळी आपटा पंचायत समिती सदस्य मयुर शेलार. याचा तसेच आपटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टरांचा सत्कार केला.

# पेणजवळ बसला आग : जीवितहानी टळली




**पेण : प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावर पेणजवळील अंतोरा फाटा येथे एका खाजगी बसला आग लागल्याची घटना घडली आहे.

या बाबत माहिती अशी की, शनिवार दिनांक २३ मे रोजी चिपळूण ते घाटकोपर जाणारी खाजगी कंपनीची बस क्र. एमएच ०३ ई जी ९२७७ हिला पेणमध्ये पहाटे ५ च्या सुमारास अंतोरा फाट्याजवळ आग लागल्याने महामार्गावर एकच गोंधळ उडाला होता. यावेळी पेण अग्निशमन दलाने प्रसंगावधान राखत तत्काळ आग आटोक्यात आणली.

बसमध्ये कोणीही प्रवासी नसल्याने कोणतंही जीवितहानी झाली नाही परंतु बसचे नुकसान झाले आहे. यावेळी काही वेळेपुरती वाहतूक कोंडी झाली

## नवी मुंबई शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६

# मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक २०२६ अंतर्गत गुरूवार दिनांक ०४ जून २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आज दिनांक २१ मे, २०२६ रोजी ज्ञानकेंद्र, मुख्यालय येथे दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत मतदान अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी अजय साबळे हे उपस्थित होते.प्रशिक्षणामध्ये निवडणुकीचा उद्देश, मतदान कार्यपद्धती, मतमोजणी प्रक्रिया तसेच निवडणूक प्रक्रियेत अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या आणि भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी निवडणुकीचा संपूर्ण



कार्यक्रम विषद करून मतदान विषयक पूर्वतयारी, आचारसंहिता, मतदानासंदर्भातील सार्वजनिक प्रसिद्धी तसेच विविध कायदेशीर बाबींची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

त्याचप्रमाणे श्री. पिंपळसे यांनी मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक वाहन व्यवस्थापन आराखड्याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे विभाग अधिकारी तसे निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप गायकवाड यांनी केले.

# पोलादपूरला अपघातात दुचाकीस्वार ठार, दुसरा गंभीर जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकण गावाच्या हद्दीतील गोपाळवाडी येथे साईडपट्टी नसलेल्या रस्त्यावरून नियंत्रण सुटल्याने मोटारसायकलची झाडाला जोरदार धडक बसून मोटारसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला. या मोटारसायकलवरील दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात शनिवारी सायंकाळी कापडे बुद्रुक गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर झाला आहे.

प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, मोटारसायकल (क्र.एमएच ०१ जी ९४२७ ) घेऊन ग्रुप ग्रामपंचायत देवळे हद्दीतील लहुळसे गावातील तरुण भरधाव वेगात असताना वाकण पितळवाडी जवळच्या गोपाळवाडी येथे रस्त्याला साईडपट्टी नसल्याने मोटारसायकलीवरील नियंत्रण सुटून रस्त्याच्या कडेला असलेल्या महाकाय वृक्षाला मोटारसायकलने जोरदार धडक दिली. या अपघातात मोटारसायकलस्वार रोहित धनावडे याचा जागीच मृत्यू झाला. मोटारसायकलवर मागे बसलेला एक तरुण गंभीर जखमी झाला आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर मृत रोहित धनावडे व जखमी तरुण (दोघेही रा.लहुळसे ता पोलादपूर) यांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले.

# खांडपे गावातील कमी दाबाच्या वीज पुरवठ्याने ग्राहक हैराण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील खांडपे गावात गेल्या वर्ष भरापासून सुरू असलेल्या कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी महावितरण कंपनीकडे लेखी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

खांडपे गावात कमी दाबाच्या वीज पुरवठ्याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. रात्री अपुऱ्या प्रकाशामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या मोटारीही व्यवस्थित सुरू होत नसल्याने गावात पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या



म्हणण्यानुसार, गावातील वीज वाहक तारा जुने जुन्या झाल्या आहेत. खांडपे गावात सध्या फक्त १६० ते १८० व्होल्ट इतकाच वीज दाब मिळत असल्याने घरातील बल्ब, पंखे, फ्रीज तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे व्यवस्थित चालत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अनेक उपकरणे बंद पडण्याच्या स्थितीत असून आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

याबाबत महावितरण कडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त करत महावितरण विभागाने तातडीने दखल घेऊन आवश्यक दुरुस्ती व सुधारणा कराव्यात. अशी मागणी केली आहे.दरम्यान, समस्या कायम राहिल्यास ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावर आता नगरसेवकांचा 'वॉच'

## चार वर्षांनंतर जन आरोग्य समित्यांची स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोना काळामुळे लांबणीवर पडलेल्या त्यानंतर बरखास्त झालेल्या समित्यामुळे तब्बल चार वर्षा पेक्षा जास्त काळ समित्यांच्या नियुया रखडल्या होत्या मात्र या समित्यांच्या स्थापनेला मुहूर्त मिळाला असुन

पनवेल महापालिका क्षेत्रात २६ समित्यांची स्थापना करून स्थानिक नगरसेवकांना त्यांच्या अध्यक्षस्थानी नेमण्यात आले आहे.राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून चालणाऱ्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ९ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र आणि २ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अशा एकूण २६ सरकारी दवाखान्यांसाठी या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

समितीचे अध्यक्षपद स्थानिक नगरसेवकाकडे तर सहअध्यक्षपद पालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश नायर यांच्याकडे असणार आहे.आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या देखरेखीत या समित्या पालिका क्षेत्रात रुग्ण ,नागरिक यांच्या पर्यंत पालिकेची आरोग्य सेवा पोहचवतील.२०२१ मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्य यंत्रणेवर ताण आला होता. त्यावेळी शासनाने या समित्या बरखास्त केल्या. त्यानंतर प्रशासक राजवटीत नवीन समित्या स्थापन झाल्याच नाहीत. परिणामी गेल्या चार वर्षांत सरकारी दवाखान्यांमधील कारभारावर देखरेख ठेवणारी यंत्रणाच अस्तित्वात नव्हती. डॉक्टरांची अनियमितता, औषधांचा तुटवडा, अस्वच्छता, रुग्णांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष अशा समस्यांनी डोके वर काढले होते. आता मात्र चित्र बदलणार आहे.स्थानिक आरोग्य केंद्रातील लहानसहान तक्रारी या समित्यांच्या माध्यमातून सोडवता येणार आहेत.




याकरिता सुमारे १ लाख ते १.७५ लाखांचा निधी प्रतिवर्षी या समित्यांना मिळणार आहे.दोन वर्ष समित्यांचे अध्यक्षपदी नेमलेले नगरसेवक कार्यान्वित राहणार आहेत.शासन निर्णयानुसार या समित्यांना व्यापक जबाबदारी देण्यात आली आहे. आयुष्मान भारत योजनेंतर्गत दवाखान्यात दर्जेदार आरोग्य सेवा पुरवणे, सिटिझन चार्टरनुसार सेवा मिळते का याची खात्री करणे ही समितीची मुख्य भूमिका आहे. असंसर्गजन्य रोग, गंभीर आजार, डोळे, कान, नाक तपासणी तसेच गरोदर माता, स्तनदा माता, लहान बालके व किशोरवयीन मुलांसाठी शिबिरांचे आयोजन करणे समितीला बंधनकारक आहे.

याशिवाय दवाखान्यात सुरक्षित पिण्याचे पाणी, कचरामुक्त परिसर, स्वच्छ शौचालये, स्वच्छ लिनन, स्वच्छ प्रतीक्षालय, जैव कचऱ्याची योग्य विल्हेवाट आहे का, याची तपासणी करून फलक लावले आहेत का हे पाहणे समितीचे काम आहे. अत्यावश्यक औषधांची यादी व निदानात्मक चाचण्या उपलब्ध आहेत का, याची खात्री करावी लागेल. गरीब व असुरक्षित घटकांना कोणत्याही अडवणुकीशिवाय सेवा मिळाली पाहिजे, त्यांना सेवा नाकारता येणार नाही, यावर समिती लक्ष ठेवणार आहे. सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांतून जनजागृती करणे व गंभीर रुग्णांचा घरी जाऊन पाठपुरावा करणे ही जबाबदारीही समितीवर आहे.

**बैठका व कारवाईचे नियम कडक**

समितीची दरमहा एक याप्रमाणे वर्षाला किमान १० बैठका घेणे बंधनकारक आहे. बैठकीसाठी ४० टक्के गणसंख्या आवश्यक असून कोरमअभावी बैठक तहकूब झाल्यास त्याच दिवशी पुन्हा घ्यावी लागेल. नवीन खर्चाच्या प्रस्तावांना ५० टक्के सदस्यांची मंजुरी तर प्रत्येक कामाच्या मंजुरीसाठी २/३ सदस्यांची सहमती आवश्यक आहे. समितीला दरवर्षी मार्चच्या बैठकीत मागील वर्षीच्या खर्चाचा व कामाचा अहवाल सादर करावा लागेल.

**आरोग्य केंद्रांचे अध्यक्ष**

प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र – १५: पनवेल–१ दर्शना भोईर, पनवेल–२ प्रिती जॉर्ज , नवीन पनवेल –मनोज भुजबळ, कळंबोली –बायजा बारगजे, खारघर –प्रविण पाटील, कामोठे– डॉ. अरूणकुमार भगत, काळुंद्रे –अजय बहिरा, कळंबोली गाव– रविंद्र भगत, पालेखुर्द –दिनेश खानावकर, रोहिंजण– नितेश पाटील, खांदा कॉलनी –एकनाथ गायकवाड, तळोजा फेज–२ प्रगती पाटील, रोडपाली– अमर पाटील, कामोठे से.२२ प्रदिप भगत, कामोठे से.३५ हेमलता गोवारी.

नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र – ९: टेंभोडे –महादेव मधे, कोयनावळे –विजयश्री पाटील, पडघे –अर्चना भोईर, आसुडगाव –शशिकांत शळके, तळोजा पाचनंद– लीना कातकरी, तांडरे –योगिता फडके, मोठा खांदा –मनिषा म्हात्रे, साईनगर –आर्या जाधव, ओवे गाव –तुषार पाटील.आपला दवाखाना – २: खारघर से.१२ नरेश ठाकुर, नावडे राम पाटील.

# हरविलेले १३० मोबाईल गुन्हे शाखा कक्ष ३ने केले नागरिकांना परत



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आयुक्तालय हद्दीतील तब्बल हरविलेले ४० लाख रुपये किंमतीचे १३० मोबाईल फोन गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलने आज नागरिकांना विशेष कार्यक्रमात परत केले आहेत.

पनवेल येथे असलेल्या गुन्हे शाखा कक्ष ३ कार्यालयात सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) श्रीमती प्रेरणा कट्टे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांच्या विशेष पथकाने आज हे मोबाईल परत केले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हदित मोठयाप्रमाणावर लोकवस्ती असल्याने येथे वास्तवव्यास असलेले तसेच कामानिमित्ताने आलेल्या लोकांचे प्रवासादरम्यान, खरेदीच्या वेळी तसेच इतर अनेक कारणास्तव त्यांचेकडील वापरते मोबाईल फोन गहाळ झाल्याबाबत पोलीस ठाण्यांकडे मोठ्याप्रमाणावर प्रॉपर्टी मिसींग दाखल होत आहेत. अशा प्रकारे गहाळ झालेल्या मोबाईल फोन बरोबर फोन धारकाचे नातेवाईक, मित्र व परिचित इसमांचे संपर्क क्रमांक, फोटो, व्हिडीओ, महत्वाचा डाटा, मेसेज इत्यादी स्वरूपाने त्यांच्या आठवणी त्यात जतन केलेल्या असल्याने व असे गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळुन येत नसल्याने मोबाईल गहाळ होणे हा संबंधीत मोबाईल धारकांचा भावनिक विषय बनला जातो.

मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण लक्षात घेता गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याकरीता शासन स्तरावर सीईआयआरपोर्टल कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांनी सीईआयआर. पोर्टलचा वापर करुन गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळविण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते.

त्यानुसार सदरची उल्लेखनीय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलचे वपोनि अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, रमेश शिंदे, पोहवा प्रशांत काटकर, प्रमोद राजपूत, निलेश पाटील, दिपक डोंगरे, सागर रसाळ, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, अजित पाटील, हिरकणी पाटील, पो.ना.आजिनाथ फुंडे, विनया पाटील, पो.शि.लवंकुश शिंगाडे, विक्रांत माळी, प्रसाद घरत आदींच्या पथकाने पोलीस ठाणे स्तरावर सीईआयआरपोर्टल वर गहाळ झालेल्या मोबाईल फोनची तसेच संबंधीत फोन धारकाची आवश्यक ती माहिती भरल्यानंतर सदर हरवलेल्या मोबाईलचा शोध हा पोहवा इंद्रजित कानु, गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल यांचेकडुन देखिल समांतर शोध सुरू करून गहाळ झालेल्या अंदाजे ३९,७५,०००/–रुपये किंमतीचे १३० मोबाईल फोन परत केले.

## निवडक

### शिवीगाळ करून दिली धमकी

**नवीन पनवेल :** फळ विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या इसमाला शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिल्या प्रकरणी विलास म्हात्रे (राहणार ओवे गाव) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २१ मे रोजी तक्रार दाखल करण्यात आली. सलीम छोटे शेख हा ओवेगाव येथे फळ विक्रीचा व्यवसाय करतो. यावेळी विलास म्हात्रे यांनी त्या ठिकाणी जाऊन ती जागा माझी आहे दुकान लावायचे पैसे द्यावे लागतील असे त्याला सांगितले. यावेळी सलीम याने पैसे देण्यात नकार दिला. यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. आणि म्हात्रे यांनी त्याला शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिली.

### डिझेलची चोरी, गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** डिझेलच्या टाकी मधून डिझेल चोरल्या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात २२ मे रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राम प्रताप नेपाल राजभर यांनी २२ मे रोजी ट्रेलर पार्क केला आणि ते चहा पिण्यासाठी रस्त्याच्या पलीकडे गेले. यावेळी अज्ञात इसमाने ट्रेलरच्या मुख्य डिझेलच्या टाकीमधून अडीचशे लिटर २३ हजार २५० रुपयांचे डिझेल चोरले.

### दांडक्याने मारहाण करून केले जखमी

**नवीन पनवेल :** लाकडी दांडक्याने २४ वर्षीय तरुणाच्या डोक्यात मारहाण करून त्याला जखमी केल्याप्रकरणी दोघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.ऋतिक काशिनाथ वाघमारे (वय २४ राहणार देवळोली) हा घरी असताना त्याच्या बाजूला राहणारे दशरथ वाघमारे आणि विलास वाघमारे यांनी ऋतिक त्याच्या घरी येऊन त्याला शिवीगाळ आणि दमदाटी केली तसेच लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करून त्याला जखमी केले.

# पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांचा वडघर पंचायत समिती गणाचा दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत**

पनवेल पंचायत समिती सभापती रंजना सदाशिव वास्कर ,वडघर जिल्हा परिषद सदस्य सोनाली अनुज जितेकर, वडघर पंचायत समिती सदस्य मनीषा गजानन पाटील यांनी वडघर पंचायत समिती गणातील वडघर, पारगाव,दापोली, वाधिवली व करंजाडे पंचायत समिती गणातील करंजाडे व नानोशी मधील मानघर, मोसारे, पाटनोली, नानोशी, बेलवाडी ,गराडा ,येथील ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी,स्मशानभूमी, या ठिकाणी शुक्रवारी ( दि. २२) भेटी देऊन त्या ठिकाणच्या अडीअडचणी व पाण्याच्या व इतर समस्या समजून घेतल्या. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निधीतून सदरची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याबाबत ग्रामस्थांना आश्वासित केले



यावेळी पाणीपुरवठा अभियंता रुजूता महाजन वडघर जिल्हा परिषद गट विभागीय अध्यक्ष गजानन पाटील, दापोली सरपंच निकिता घोपरकर, माजी सरपंच समाधान घोपरकर माजी उपसरपंच संदीप गोसावी माजी उपसरपंच विलास दमडे, ग्रामपंचायत सदस्य नीलम पाटील ग्रामपंचायत सदस्य जयवंती जितेकर ग्रामपंचायत अधिकारी वृंदा बंदरकर आरोग्य सेवक स्वप्निल पाटील, आरोग्य सेविका प्रणिता पाटील सीएमओ डॉक्टर जाधव अंगणवाडी सेविका सुगंधा जितेकर मदतनीस कविता जाधव आशा सेविका सीमा पाटील पारगाव ग्रामपंचायत मधील रत्नाकर पाटील माजी सरपंच महेंद्र पाटील माजी सरपंच कैलास तारेकर, अंकुश नाईक ,प्रतिभा वानखेडकर ग्राम विकास अधिकारी वाधिवली ग्रामपंचायत मधील अनिल पाटील सरपंच, कृष्णा भोईर उपसरपंच, अंबादास जाधव ग्रामपंचायत अधिकारी, व कर्मचारी इतर ग्रामस्थ .

ग्रामपंचायत वडघर मौजे चिंचपाडा येथील समीर मदन केणी वडघर विभागीय अध्यक्ष भाजप अभिजीत केणी सामाजिक कार्यकर्ता वडघर बौद्धवाडी येथील शरद कांबळे अध्यक्ष भरत सोनावणे माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल भातणकर सामाजिक कार्यकर्ता वडघर मोहल्ला येथील बशीर लतीफ खान माजी ग्रामपंचायत सदस्य सलीम शेख सामाजिक कार्यकर्ता मौजे कोपर येथील हरिचंद्र वामन केणी सामाजिक कार्यकर्ता तसेच आरोग्य उपकेंद्र येथील सर्व अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग ग्रामपंचायत वडघर येथील सर्व कर्मचारी

करंजाडे ग्रामपंचायत मधील सरपंच मंगेश शेलार, सदस्य सूरज कर्णा शेलार, व कार्यकर्ते कैलास शेलार व ग्रामपंचायतअधिकारी मनिषाजायभाये.ग्रामपंचायत नानोशीयेथील सरपंच संगितापाटील उपसरपंचअनिरुध्दपाटील विनंती पाटील .दिनेश पारधी,समाधान ठाकरे,प्रकाश पाटील माजी पंचायत समिती सदस्य.श्रावण महादू भल्ला ग्रामस्थ.रमेश पाटील ,प्रगट कडू, सुनिल भगत.चंद्रकांत पाटील व इतर ग्रामस्थ ग्रामपंचायत अधिकारी गुलाब म्हात्रे उपस्थित होते.

# उरण येथे आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

भूपाळी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित उरण येथे आरोग्य शिबिर राबविण्यात आले . भूपाळी मध्ये वंचित बहुजन आघाडी उरण तालुका उपाध्यक्ष तुषार उत्तम गायकवाड यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

उरण क्रोप्रोली सरकारी दवाखाना मार्फत वैद्यकीय चिकित्सा डॉक्टर डॉ. पुजा पाटील यांनी नागरिकांना तपासणी केली आणि औषध उपचार करण्यात आले.

सेक्टर १२ द्रोणागिरी नोड रहिवाशी,भूपाळी सोसायटी द्रोणागिरी नवी मुंबई मधील रहिवाशी,भूपाळी सोसायटी द्रोणागिरी नवी मुंबई मधील रहिवाशी, भैरवी सोसायटी मधील रहिवाशी,भूपाळी गृहसंकूल, मल्हार गृहसंकूल, भैरवी गृहसंकूल आणि सेक्टर १२ मधील रहिवाशांनी महिलांनी वृध्द व्यक्तींनी शिबीराचा मोठया प्रमाणात लाभ घेतला.

या शिबिराला जनतेचा चांगला प्रतिसाद लाभला.क्रोप्रोली सरकारी दवाखाना मधील डॉ पुजा पाटील,आरोग्य सेवक संदीप पारस्वले, सीमा बंडा आशा सेविका नवघर, अर्पणा बंडा आशा सेविका नवघर,आरोग्य सेवक हेमंत यांचे विशेष सहकार्य लाभले.



# आयटीएम बिझनेस स्कूलमध्ये 'एआय' अभ्यासक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल आयटीएम बिझनेस स्कूलने 'एमबीए इन अप्लाइड एआय' हा नवीन पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू केला आहे. एआयच्या वाढत्या वापरामुळे भविष्यातील व्यवस्थापन क्षेत्रासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याच्या उद्देशाने हा कोर्स सुरू करण्यात आला आहे.यावेळी झालेल्या कार्यक्रमात योटा डेटा सर्व्हिसेसचे सहसंस्थापक व सीईओ सुनील गुप्ता प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

एआयचे भविष्य सिलिकॉन व्हॅलीच्या पलीकडे विस्तारले आहे. व्यवसायाची उत्तम जाण आणि एआयचा प्रभावी वापर करणाऱ्या व्यावसायिकांची गरज आहे असे गुप्ता म्हणाले. आयटीएम ग्रुपचे नितीन पुचा यांनी एआयच्या वाढत्या प्रभावामुळे कुशल व्यावसायिकांना मिळणाऱ्या संधींवर प्रकाश टाकला. एआय ही आता भविष्यातील संकल्पना राहिलेली नाही. आमचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व्यावहारिक, उद्योग–संबंधित एआय क्षमतांनी सुसज्ज करेल असे बिझनेस स्कूलच्या संचालक डॉ. लक्ष्मी मोहन म्हणाल्या.

या अभ्यासक्रमात मार्केटिंग, फायनान्स, मानव संसाधन व ऑपरेशन्स यांसारख्या शाखांमध्ये एआय वर्कफ्लो तयार करणे, प्रक्रिया स्वयंचलित करणे व इंटेलिजंट सिस्टिम्स वापरण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रा. आर.एस.एस. मणी यांनी एआयचा शिक्षणाच्या वाढत्या मागणीवर भर दिला.

# प्रवासादरम्यान सोन्याचे दागिने व रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** एसटीने प्रवास करत असताना ५५ वर्षीय इसमाकडील सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात २२ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. निवास दत्तात्रय कदम हे आझादपूर, कोरेगाव, येथे राहत असून २० मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास आझादपूर, कोरेगाव, सातारा ते श्री गणेश सोसायटी नावडे फेस २ या दरम्यान एसटीने आणि रिक्षाने प्रवास करत असताना प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्याकडील सोन्याची गंठण, टॉप्स, सोन्याची फुले, चैन आणि रोख रक्कम असा एकूण सात लाख ६६ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबतगुन्हा दाखल करण्यात आला आहे .

# कामोठेत अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' कामोठे अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच विविध ठिकाणी अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या तसेच जाहिरात टेम्पो यांच्यावर विशेष कारवाई करण्यात आली.

कामोठे विभागातील मानसरोवर रोड, खांदेश्वर रेल्वे स्टेशन रोड, गणपती मंदिर परिसर, सेक्टर १८ नीलकंठ स्वीट परिसर, ॲक्सिस बँक समोरील परिसर, मोठा खांदा हायवे जवळील सेक्टर २२ तसेच कजरी समोरील फुटपाथ परिसरात ही कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई मा. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली.



या कारवाईदरम्यान फुटपाथ व सार्वजनिक रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांच्या हातगाड्या, टेम्पो तसेच विविध साहित्य जप्त करण्यात आले. नीलकंठ चौक येथून आईस्क्रीम व केएफसीची हातगाडी जप्त करण्यात आली. ही गाडी तसेच १ हातगाडी व १ अनधिकृत जाहिरात टेम्पो जप्त करून सुवर्णदुर्ग कार्यालय, कामोठे येथे जमा करण्यात आले.

अतिक्रमण विभागाने केलेल्या कारवाईमध्ये एकूण १८ सिलेंडर, १८ हातगाड्या, १५ आईस्क्रीम गाड्या, १ जाहिरात टेम्पो, २ शिलाई मशीन, १७ खुर्च्या, ३ टेबल, १ वजन काटा, २ तवे, १ चायनीज काउंटर तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. अनधिकृतरीत्या आंबे विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवरही कारवाई करून त्यांच्या गाड्या व आंब्याच्या पाट्या जप्त करण्यात आल्या.

सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि वाहतूक व्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत व्यवसायांवर पुढील काळातही नियमितपणे कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अतिक्रमण विभागामार्फत अधिक्षक दशरथ भंडारी यांनी दिली आहे. प्रभाग समिती क कामोठे मध्ये सोमवार ते बुधवार व गुरुवार लागणाऱ्या आठवडे बाजारांवर अतिक्रमण विभागाने तोडक कारवाई करून हे बाजार बंद केले आहेत.

# कान्स चित्रपट महोत्सव

## अशोक सराफ आणि निवेदिता रेड कार्पेटवर लक्षवेधक







कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात देश विदेशातील अनेक भाषेतील चित्रपट दाखविण्यात आले. त्यातून जगभरातील अनेक देशांतील चित्रपटात आलेल्या नवीन आशय, विषय, दिग्दर्शकांचा दृष्टिकोन आणि आधुनिक तंत्रज्ञान याचे दर्शन घडले. मराठी चित्रपट रसिकांसाठी या कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील सर्वाधिक लक्षवेधक गोष्ट म्हणजे रेड कार्पेटवर आपल्या अशोक सराफ आणि निवेदिता यांची लक्षवेधक उपस्थिती.

प्रसारमाध्यमातून या गोष्टीला भरभरुन कव्हरेज मिळाले (अनेक सकारात्मक प्रतिक्रिया उमटल्या) आणि अशोक सराफ आणि निवेदिताचे मराठी चित्रपट रसिकांनी भरभरुन कौतुक केले. महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त, पद्मश्री अशोक सराफ यांच्या कारकीर्दीतील हा आणखी एक मोलाचा क्षण. अशोक सराफ अफाट प्रतिभेचा कलाकार. खरं तर नायक, खलनायक, सहाय्यक भूमिका, चरित्र भूमिका अशी त्यांची चौफेर वाटचाल सुरू आहे. ते फक्त आणि फक्त विनोदी अभिनेता नाहीत. त्यांनी विनोदी व्यक्तीरेखा साकारल्या, म्हणजे ते विनोदी कलाकार होत नाही, असं खुद्द अशोक सराफचेही म्हणणं आहे. अशोक सराफशी माझा दीर्घकालीन परिचय. अगदी अशोक सराफच्या ग्रॅण्ड रोड येथील चिखलवाडीतील घरीदेखील मी गेलो आहे.

एका भेटीत अशोक सराफनी मला सांगितले, (अशोक सराफ भडाभडा बोलणारी व्यक्ती नाही. चांगला परिचय झाल्यावरच मोकळेपणाने बोलणार हा माझा स्वानुभव) मी केवळ विनोदच करतो असं नाही. त्यामुळे अशोक मा. मा. या मालिकेतली भूमिका विनोदी नाही हे कळल्यावर समाधान वाटलं'; त्यांनी सांगितले, 'अशोक मा. मा.' या मालिकेतली माझी व्यक्तिरेखा खऱ्या अशोक मामांसारखी मुळीच नाही. अशोक माधव माजगांवकर असं मालिकेतल्या भूमिकेचं पूर्ण नाव आहे हे आता वेगळे सांगायला नकोच. आता ही मालिका संपून बरेच दिवस झाले आहेत. ही व्यक्तिरेखा विनोदी नाही याचा मला अधिक आनंद झाला होता. कारण, मी केवळ विनोदच करतो असं नाही. वास्तविक जीवनात तुमच्या आजूबाजूला असलेल्या माणसाचं प्रतिबिंब मालिकेत दिसले, अशीच मला अनेकांकडून प्रतिक्रिया मिळाली. माजगांवकर हा तत्त्वनिष्ठ होता. 'शिस्त म्हणजे शिस्त' हे त्याचं ब्रीदवाक्य असतं. या पात्राला विविध छटा असल्याने ही भूमिका साकारताना मजा आली. खूप एन्जॉय केली मी ही मालिका. अंधेरी पश्चिमेकडील माझ्या घरुन अंधेरी पूर्वेकडील सेटवर ये जा करणे म्हणूनच कधी कंटाळवाणे वाटले नाही.

अशोक सराफनी पुढे सांगितले, मध्यंतरीच्या वर्षांत मला मालिकांसाठी कोणी विचारलंच नाही. यावेळी मात्र वाहिनीचे प्रोग्रामिंग हेड केदार शिंदे यांनी निर्माती निवेदिता सराफला सांगितलं की निवेदितानं केदारला सांगितलं हे काही मला माहिती नाही. काही घडामोडी घडल्या हे नक्की. पण घरातूनच पहिल्यांदा विचारणा झाल्यामुळे माझ्याकडे होकार देण्याशिवाय दुसरा काही पर्यायच नव्हता. 'सही रे सही'पासून 'बाईपण भारी देवा' अशा दर्जेदार कलाकृती दिल्या आहेत असा केदार शिंदे या मालिकेशी जोडला गेला आहे; त्यामुळे मला अपेक्षित असलेलं वेगळेपण मालिकेत नक्की असणार याची खात्री पटली. चित्रीकरणाचं काम सुरू झाल्यावर ही मालिका खरंच वेगळी आहे हे अधोरेखित झालं. अशोक सराफ यांच्या म्हणण्याचा प्रत्यय ही मालिका प्रक्षेपित झाल्यावर आलाच.

अशोक सराफ आणखीन काही गोष्टींवर भाष्य केले , नवोदित कलाकार माझ्यासोबत काम करताना मला घाबरतात का ते मला माहित नाही, तर माझ्या 'सिनियॉरिटी'ला ते घाबरतात. मी मात्र नेहमी सेटवर पहिल्या भेटीतच त्यांना आपलंस करतो; रिलॅक्स झोन देतो, जेणेकरून त्यांना काम करताना दडपण येणार नाही. मीच अनेकदा पुढाकार घेऊन त्यांच्याशी गप्पा मारतो; कुठून आलात, कसं आलात वगैरे वगैरे विचारपूस करतो. आमच्या सेटवर बालकलाकारदेखील होते. खूप धमाल , मौजमजा करत. पण 'ॲक्शन' म्हटल्यावर तितकंच तन्मयतेनं ते कामही करत हे जास्त महत्वाचे. अशोक सराफनी याच गप्पांत सांगितले, मी अनेक वर्षे अनेक मराठी हिंदी मालिका आवडीनं पाहतो. 'पिरतीचा वनवा उरी पेटला' ही मालिका मला आवडायची. निवेदिता काम करत असल्यामुळे 'भाग्य दिले तू मला' ही मालिकाही मी पाहायचो. आता मी आणि निवेदिता आम्ही दोघंही एकाच वेळी टीव्ही माध्यमात काम करतोय. त्यामुळे यापुढे निवेदिता माझी मालिका पाहणार आणि मी तिची! अशोक सराफ सहज गंमत म्हणून म्हणाले.

'हम पांच'पासून ते आता 'अशोक मा.मा.' या मालिकेपर्यंत अठ्ठावीस तीस वर्षात अशोक सराफ यांना स्वाभाविकपणे काही फरक जाणवतोय. तेव्हाची काम करण्याची पद्धत अत्यंत साधी होती. सुरुवातीला 'हम पांच'वर काहीशी टीका झाली. कारण, ती मालिका तेव्हाच्या इतर मालिकांपेक्षा वेगळी होती. तशा धाटणीची मालिका तोवर कोणी हाताळली नव्हती. मालिकेचे लेखक इम्तियाज पटेल रोज वर्तमानपत्रात एक वाक्य वाचायचे आणि त्यावर मालिकेचा पूर्ण भाग लिहायचे; इतके ते मातब्बर होते. मालिकेतल्या माथुर कुटुंबात सात महिला आणि मी एकटा पुरुष अशा विभिन्न व्यक्तिरेखा होत्या. माझ्या पाच मुली, फोटोत दिसणारी पहिली बायको आणि घरात असणारी दुसरी बायको अशा सात जणींमध्ये मी वावरायचो. आजसारखं पूर्वी अद्ययावत तंत्र नव्हतं. त्यामुळे आम्ही सर्व कलाकार एका रांगेत उभं राहायचो आणि आपापली वाक्य कॅमेऱ्यासमोर बोलायचो; त्यामुळे ती सरळसोट वाटायची. तरीही ती मालिका प्रेक्षकांना आवडली; खूप मनोरंजन करणारी ठरली.कारण आम्ही काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न केला. तसंच यावेळी 'अशोक मा. मा' या मालिकेतूनही आम्ही नवं देण्याचा प्रयत्न केला.

अशोक सराफना आजूबाजूच्या अनेक गोष्टींचे भान असते हा माझा दीर्घकालीन अनुभव. अशोक सराफ येथेच इतरांपासून वेगळे.आज जुने हिंदी चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत असले तरी मराठी सिनेमे पुनर्प्रदर्शित होऊ नयेत. कारण, मराठी प्रेक्षक मराठी सिनेमे फक्त टीव्हीवर पुन्हा-पुन्हा पाहतात. हिंदी सिनेमांचा प्रेक्षक आणि त्यांची मानसिकता वेगळी आहे. हिंदी सिनेमांची धाटणी वेगळी आहे. तो पाहण्यासाठी प्रेक्षक पुन्हा सिनेमागृहात जातो. तोलून, मापून पाहणारा चोखंदळ असा मराठी रसिक प्रेक्षक आहे. मराठीच्या बाबतीत तसं घडत नाही.

मागे वळून पाहताना कोणत्या भूमिका अशोक सराफ यांच्या स्मरणात आहेत यावर ते म्हणतात, मी साधारण अडीचशेच्या आसपास मराठी-हिंदी सिनेमे केले असतील. अगदी 'ब्लॅक अँड व्हाइट' चित्रपटापासून ते आता 'डिजिटल'पर्यंतच्या सर्व भूमिका माझ्या स्मरणात नसल्या तरी त्या प्रेक्षकांच्या मात्र आठवणीत असतील. 'बिनकामाचा नवरा'मधला कामधाम न करणारा नवरा तुकाराम, 'सासू वरचढ जावई'मधला इरसाल जावई, 'एक डाव भुताचा'मधलं सरदाराचं भूत, 'गुपचूप गुपचूप'मधले प्रा. धोंड, 'धुमधडाका'मधला 'व्याख्ख्या विख्खी व्यूख्खू...' करणारा महेशचा मित्र कम इरसाल म्हातारा, 'प्रेम करू या खुल्लम खुल्ला'चा बजरंग, 'माझा पती करोडपती'चा दिनकर लुकतुके आणि रनगाडे, 'अशी ही बनवाबनवी' मधला 'हा माझा बायको पार्वती' म्हणणारा धनंजय माने... ही यादी मोठी आहे. दुसरीकडे मी हिंदीतही काम केलं; पण मी तिकडे फार रमलो नाही. तरीही 'ठाकूर तो गियो...'असं म्हणणारा 'करण अर्जुन'चा मुंशीजी, 'येस बॉस'मधला जॉनी अशा काही भूमिका स्मरणात आहेत. अशा या माझ्या विविधांगी भूमिकांवर मराठी प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलं. एक प्रकारे या विविधतेशी अशोक सराफ यांची जोडी जमली असेच म्हणायला हवे. अशोक सराफकडे सांगण्यासारखे बरेच काही आहे हे मला कायमच अनुभवायला मिळाले.

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

सगळ्याचे च सिक्वेल होणार नाहीत याचे अशोक सराफ यांना भान आहे. ते एकदा मला म्हणाले, ''नवरा माझा नवसाचा २' या सिनेमाला मिळालं. पण, आता सगळ्याच सिनेमांचे दुसरे भाग बनवता येतील; असं नाही. 'अशी ही बनवाबनवी'चा दुसरा भाग होऊ शकत नाही. आता ' पुन्हा साडे माडे तीन' सिनेमात मी होतो. त्यात पहिल्या सिनेमातल्याच व्यक्तिरेखा होत्या; परंतु, गोष्ट नवीन होते हे चित्रपट पाहिल्यावर लक्षात आले असेलच. माझ्यासाठी या वयात वेगळ्या धाटणीच्या भूमिका लिहिल्या जात नाहीत ही खंत मला आजही वाटते. एखादी नवी भूमिका हाती घेताना मला काहीतरी एकदमच 'वेगळं' हवं असतं असं नाही. पण, माझ्या यापूर्वीच्या कामांपेक्षा त्या भूमिका काही प्रमाणात तरी विभिन्न असतील तरी मला अभिनेता म्हणून समाधान मिळतं; ती भूमिका साकारायला उत्साह मिळतो.

अशोक सराफ आणि निवेदिता सराफ या कलाकार पती पत्नीबद्दल बरेच काही सांगता येईल. निवेदिता यांनी आपल्या वयाहून तब्बल अठरा वर्षांनी मोठ्या असलेल्या अशोक सराफ यांची आयुष्याचा जोडीदार म्हणून निवड केली. दोघेही तेव्हाचे म्हणजे ऐंशीच्या दशकातील मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकार. दोघांची लव्हस्टोरी संपूर्ण मराठी चित्रपटसृष्टीत परिचयाची आहे. चित्रपटसृष्टी आणि चित्रपट रसिकांच्या लाडक्या मामांच्या प्रेमात पडणाऱ्या निवेदिता सराफ मागील तीन साडेतीन दशकापासून अधिक काळ मामांची सावली बनून उभ्या आहेत. एक आदर्श जोडपं म्हणून दोघांकडे पाहिलं जातं.

अशोक सराफ आणि निवेदिता यांच्या लव्हस्टोरीचे अनेक किस्से आहेत. 'अशीही बनवा बनवी', 'धुम धडाका', 'माझा छकुला', 'नवरी मिळे नवऱ्याला', 'मामला पोरीचा' अशा अनेक सिनेमांमध्ये दोघांनी एकत्र काम केलं आहे. अशोक मामांना त्यांच्या प्रेमाची पहिली कबूली ही रमेश साळगावकर दिग्दर्शित "मामला पोरीचा" या सिनेमाच्या सेटवर मिळाली होती. अशोक मामांनी स्वतः हा किस्सा सर्वांबरोबर शेअर केलाय.

अशोक सराफ आणि निवेदिता "मामला पोरीचा" या सिनेमात एकत्र काम करत होते. एके दिवशी शुटींगचं लवकर पॅकअप झालं आणि निवेदिता सराफ अशोक मामांकडे आल्या. तेव्हा निवेदिता अशोक मामांना अहो जाओ करत होत्या. त्या त्यांना फिल्मी पध्दतीने अशोकजी म्हणायच्या. निवेदिता अशोक मामांकडे गेल्या आणि त्यांना अशोकजी बाय बाय असं म्हणाल्या. निवेदिता त्यांना बाय म्हणून निघून जात आहेत हे बघून अशोक मामांना थोडं वाईट वाटलं होतं पण त्यांनी ते चेहऱ्यावर दाखवलं नाही.

निवेदिता सेटवरून निघाल्या. सेटच्या दरवाज्याच्या दिशेने जायला निघाल्या. त्या दरवाज्याला मध्ये मध्ये गॅप होत्या. त्या गॅपमधून समोर जात असलेली व्यक्त स्पष्ट दिसायची. निवेदिता निघाल्या तेव्हा अशोक मामा दरवाज्याच्या त्या गॅपमधून त्यांच्याकडे बघत होते. निवेदिता देखील दरवाज्यात जाऊन त्या गॅपमधून माझ्याकडे बघणार याची खात्री मामांना होती आणि अगदी तसंच झालं. निवेदिता दरवाज्याजवळ गेल्या आणि त्यांनी त्या गॅपमधून अशोक मामांकडे वळून पाहिलं. तिथेच मामांना कळलं होतं की निवेदिता आपल्या प्रेमात आहे आणि आपल्या प्रेमाची नय्या पार झाली आहे. हे अशोक सराफच्या लक्षात आले. अशोक सराफ आणि निवेदिता यांच्या यशस्वी नात्याच्या वाटचालीतील कान्स चित्रपट महोत्सवातील त्याची रेड कार्पेटवरील लक्षवेधक उपस्थिती हे आणखी एक विशेष उल्लेखनीय पाऊल.

# पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ

पर्यावरण क्षेत्रात हिमालयाएवढे काम उभे करणारे, पर्यावरण आणि परिसंस्था वाचवा असे सांगणारे पर्यावरण शास्त्रज्ञ प्रा. माधव गाडगीळ यांची आज जयंती. त्यांचा जन्म २४ मे १९४२ रोजी पुणे शहरात झाला होता. शालेय शिक्षण पुण्यातच झाले.


प्रा. माधव गाडगीळ यांचे वडील धनंजयराव 'बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे' आजीव सदस्य होते. सलीम अलींसारखे ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ त्यांचे मित्र होते. जे.बी.एस. हाल्डेन हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ गाडगीळांच्या वडिलांच्या परिचयाचे होते. त्यांचे घर पुण्यात जैवविविधता टिकवून ठेवलेल्या वेताळ टेकडीच्या परिसरात असल्याने भटकंती करणाऱ्या माधवरावांना जीवशास्त्र या विषयात रस निर्माण झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. नंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई येथून सागरी जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी मिळवली.

पीएचडीच्या अभ्यासासाठी पुढे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात ते गेले. जीवशास्त्र विषयात गणितीय प्रतिमानांचा आधार असणारा प्रबंध सादर करणारे माधवराव हार्वर्डमधील पहिलेच विद्यार्थी होते. त्यांच्या या कामाचा संदर्भ पुढे अनेक संशोधक दीर्घ काळ देत राहिले. गाडगीळांना विल्यम बॉसर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली माशांच्या वर्तनाबद्दल जीवविज्ञानातील पीएचडी पदवी मिळाली. त्यांच्या संशोधनासाठी हार्वर्ड कंप्युटिंग सेंटरने आयबीएम शिष्यवृत्ती त्यांना दिली होती.

हार्वर्ड विद्यापीठात उपयोजित गणित संशोधन अभिछात्र पदावर त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली. नंतर त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात जीवशास्त्र व्याख्याता, स्टॅन्फर्ड विद्यापीठात मानवी जीवशास्त्राचे अतिथी प्राध्यापक व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कलीत सन्माननीय भारतीय अमेरिकन व्याख्याता अशी पदे भूषविली.

पुढे माधव गाडगीळ भारतात परतले. त्यांनी पुण्यात दोन वर्षे 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्समध्ये (आता आघारकर संशोधन संस्था)' वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले.

भारताबाहेरील प्रतिष्ठित विद्यापीठांत अतिथी प्राध्यापक, व्याख्याता इत्यादी पदांवर संलग्न असताना १९७३ ते २००४ दरम्यान 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' बंगळुरू हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले. तेथे आधी सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, नंतर प्राध्यापक आणि शेवटी त्यांनी तेथेच 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस' ही संस्था स्थापन केली व तिचे ते अध्यक्ष होते. 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस'चे वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, धोरणकर्ते, शेतकरी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि अधिकारी एकत्र येऊन काम करत. शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही संस्थेने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन उपक्रमांत जोडून घेतले. गाडगीळांच्या प्रभावामुळे संस्थेच्या पर्यावरणविषयक सर्व प्रकल्पांत प्राण्यांचे वर्तनदेखील सातत्याने अचूक आकडेवारीत नोंदण्याचे धोरण ठेवले गेले. विज्ञानात अशा संख्यात्मक नोंदींचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. माणूस हादेखील जैवविविधतेतील एकात्म पर्यावरणीय घटक आहे. तो पर्यावरणातून वगळून चालणार नाही,



अशी विचारसरणी गाडगीळांनी ठेवल्यामुळे जैवविविधता संरक्षण, संवर्धनात स्थानिक लोकांच्या विरोधाची धार बोथट झाली.

गाडगीळांना १९७६मध्ये कर्नाटक शासनाने बांबू या नैसर्गिक संसाधनाचा अभ्यास करण्याची विनंती केली. या अभ्यासातून असे निष्पन्न झाले की वनसंपत्तीवर आधारित उद्योगांना मिळणाऱ्या काही सवलती अयोग्यच नाहीत, तर हानिकारकही आहेत त्यामुळे त्या काढून घेतल्या गेल्या.

गाडगीळ केंद्र शासनाच्या स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापन करण्यासाठीच्या समितीचे सदस्य होते. त्यांनी त्याचा आराखडा बनवून स्वतंत्र पर्यावरण विभाग साकारला. जीवावरण संवर्धनासाठी 'निलगिरी' टेकड्या संरक्षित क्षेत्रासाठीचा प्रकल्प आराखडा गाडगीळांनी तयार केला. भारतातील हा पहिलाच प्रयत्न होता. १९८६ ते १९९० या काळात ते भारताच्या पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान सल्लागार मंडळाचे सदस्य राहिले. जैवविविधता परिषदेच्या सल्लागार समितीचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. पंतप्रधानांच्या पुढाकाराने वाघांचे संरक्षण, व संवर्धन करण्याच्या हेतूने स्थापलेल्या विशेष कार्यगटाच्या पाच निष्णात सदस्यांपैकी ते एक होते.

गाडगीळ सैद्धांतिक अभ्यास व चिंतन यांना दऱ्याखोऱ्या, नद्या, वने, अशा क्षेत्रांत हिंडून प्रत्यक्ष अनुभवाची जोड देत असत. भारतातील पश्चिम घाट, राजस्थान, हिमालय आणि विदेशांतील उत्तर दक्षिण अमेरिका जोडणारा पनामा, उत्तर-पूर्व अमेरिकेतील न्यू इंग्लंड, ॲरिझोना, पूर्व आफ्रिका येथे गाडगीळांनी अभ्यासासाठी प्रवास केला.

सत्तावीस विज्ञान महाविद्यालये, अनेक विज्ञान संस्था आणि विभाग, स्थानिक लोक आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने सहा राज्यांतील दीड लाख चौकिमी एवढ्या विस्तृत पश्चिम घाटाच्या जैवविविधतेचा अभ्यास करण्यात त्यांचे प्रशासकीय कौशल्यही दिसले. गाडगीळांनी आयुष्यात अनेक पारितोषिके, पुरस्कार, सन्मान मिळवले. त्यातील काही महत्त्वाचे नागरी पुरस्कार म्हणजे भारतीय राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री आणि पद्मभूषण, आय.सी.एस.एस.आर. तर्फे विक्रम साराभाई पुरस्कार आणि पर्यावरण संरक्षणासाठी दिला जाणारा प्यू विद्वत्ता पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

द एनर्जी ॲण्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूटने (पूर्वीचे नाव टाटा एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट) प्रमुख म्हणून गाडगीळांना व त्यांच्या पश्चिम घाट परिस्थितिकी तज्ज्ञ समिती सदस्यांना (गाडगीळ कमिशन) पुरस्कार दिला. तो निकोलस रोजन यांच्या स्मरणार्थ पर्यावरणाबद्दल जीवअर्थशास्त्रासंबंधी चाकोरीबाह्य विचार व कृती करणाऱ्या आणि आपल्या भूमिकेवर ठाम असणाऱ्या व्यक्ती, संस्थांसाठी असतो. सदर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीने गाडगीळांना पर्यावरणशास्त्रातील कामगिरीसाठी टायलर पुरस्कार दिला. (साभार : मराठी विश्वकोष)

# मराठी भाषा : बोली व लिखित




वाचनाची आवड असणारे कधीही वाचनाकडे पाठ फिरवीत नाहीत. दूरदर्शनवरील विविध वाहिनीवरून प्रसारित होणाऱ्या बातम्या पहिल्या तरी सकाळी वर्तमानपत्राची ओढ असतेच. पुस्तक प्रदर्शनाकडे गर्दी असते. काही काही वेळेस नकळतपणे आपण पुडीचा कागद ही वाचतो. हल्ली मराठी भाषेतील दिनदर्शिकेत प्रत्येक महिन्याच्या पानावर मागच्या बाजूला लेख, पाककला, भविष्य, त्या त्या महिन्यातील प्रमुख सणांचे महत्व तसेच इतर माहिती असा भरगच्च मजकूर छापलेला असतो. घरात दिनदर्शिका आल्याबरोबर प्रत्येक महिन्यात आलेली माहिती आपण प्रथम वाचतो.

मराठीतून लेखन करणारे कितीजण शब्दार्थाकडे बारकाईने लक्ष देतात हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. अजूनही कित्येकांच्या मनात 'भेटणे' व 'मिळणे' या दोन शब्दांबद्दल संभ्रम आहे. व्हाट्सॲप वर जे लिखाण अथवा मेसेजेस येतात त्यात हा घोळ अजूनही आहे. जवळजवळ सगळ्याच शब्दांचे शेवटचे अक्षर दीर्घ असते याचा विचार करणे फार महत्वाचे आहे. काही जणांनी 'मराठी दिन'चे 'मराठी दीन' करून मराठीला पार कोपऱ्यात बसविले. कालाय तस्मै नमः आपण काहीच करू शकत नाही. सागराला आपण 'भरती' किंवा 'ओहोटी' येते असे आपण म्हणतो, पण काही जण ओहोटीला 'निचरा' असे संबोधतात व तो शब्द कवितेतही अंतर्भूत करतात. निचरा हा शब्द व्याकरणदृष्ट्या चुकीचा नाही, पण ओहोटी हा चांगला शब्द असताना निचरा हा नकारात्मक अर्थाकडे झुकणारा शब्द लिहिण्याचे प्रयोजन काय हा प्रश्न पडतो. 'लिहिणे का लिहणे' यातील सूक्ष्म का होईना, पण फरक लक्षात घेतला नाही, तर खरोखरच कठीण आहे. त्याचप्रमाणे 'कृतघ्न व कृतज्ञ' याबद्दल न बोललेले बरे. तसेही हा शब्द फार कमी लेखक-लेखिका वापरतात.

अभिनेत्री श्रीदेवी कालवश झाल्यावर जवळजवळ तीन दिवस तिच्याच संबंधी बातम्या होत्या. तिचे शव अंत्यदर्शनासाठी ठेवले होते. तेव्हा दूरदर्शनवरील एका उत्साही निवेदकाने असे म्हटले होते की 'श्रीदेवीच्या शेवटच्या अंत्यदर्शनासाठी तोबा गर्दी लोटली आहे'. हे ऐकल्यावर हतबल होणे म्हणजे काय याची प्रचिती येते. कालपर्यंत मित्राला 'भावा' म्हणण्याची फॅशन होती आता त्याच्याही पुढे जाऊन 'भावड्या' हा शब्द रूढ होत चालला आहे. हे सगळे बोली भाषेत होते तोपर्यंत खटकत नव्हते, पण 'भावड्या' हा शब्द कवितेत जेव्हा सर्रास वापरला जातो तेव्हा मराठी भाषा कुठे नेली जात आहे असा प्रश्न पडतो. त्याचबरोबर 'बोंबलणे' किंवा त्याचे विभक्ती प्रत्यय सर्रास वापरले जातात.

आता 'राडा' हा शब्द कवितेत लिहिला तर किती चमत्कारिक वाटेल, पण काहीजण तो आवर्जून लिहितात व 'विद्रोही कवी' म्हणून नामाभिमान मिरवतात. चपखल अर्थाच्या अलंकारिक शब्दांची खाण असलेली मराठी भाषा खरंच कोणत्या वाटेने चालली आहे कळत नाही. माझे वैयक्तिक मत आहे की बोलीभाषा असणे काही गैर नाही. भाषा म्हणजे आचार विचारांचे आदान प्रदान तसेच संपर्क भाषा असल्यामुळे त्यात काहीच उणेपणा वाटत नाही.

गुढीपाडवा या दिवशी वर्तमानपत्रात एक बातमी आली होती की 'वाहनांची बुकिंग करण्यासाठी आरटीओ कार्यालय उघडे रहाणार' हे वाचल्यावर प्रश्न पडतो की 'ते बुकिंग' का 'ती बुकिंग' यातील काय बरोबर की जे व्याकरण्याच्या नियमात बसेल. पेन 'तो' आहे की 'ती' आहे का 'ते' आहे याचाही छडा अजून लागायचा आहे. 'तो चहा' की 'ती चहा' यावर अजूनही मतभेद आहेत. त्याबद्दल अजून नक्की काही सांगता येत नाही तसेच दुर्गंधाच्या बाबतीत ही सांगता येईल. आपण 'वास आला'/'वास येतो' असे म्हणतो, पण काही जण बोलतांना 'वास मारतो' असेही म्हणतात.

बोलताना व्याकरणाचे ढोबळ नियमांचे उलंघन होत असेल तर ती गोष्ट खूप गंभीर आहे. नुसते व्याकरणातच नाही तर शब्दप्रयोगातही दुर्लक्ष केले जाते असे वाटते. आजकाल एक सर्रास वापरला जाणारा शब्द आहे 'अतिथी'. वास्तविक अतिथी म्हणजे 'तिथी न सांगता आलेला' पाहूणा अथवा अनाहूत अभ्यागत, पण आजकाल १५ दिवसांनी होणाऱ्या कार्यक्रमाची जाहिरात अशी करतात की 'अमुक अमुक दिवसांनी होणाऱ्या कार्यक्रमासाठी 'मुख्य अतिथी' म्हणून अमुक अमुक लाभणार आहेत. 'अतिथी आधीच ठरविला जाणे' ही गोष्टच पटत नाही. ठरवून येणारा 'पाहूणा' असू शकतो 'अतिथी' तर नक्कीच नाही.

मध्ये मला 'व्हाट्सॲप'वर एक संदेश आला की माझी जुनीच कविता 'प्रसारित' करीत आहे असे लिहून त्याखाली कविता पोस्ट केली. आता प्रश्न पडतो 'प्रकाशित', 'प्रसारित' या शब्दांचा नक्की अर्थ काय. माझ्या माहितीप्रमाणे 'प्रसारित' हा शब्द श्राव्य माध्यमांसाठी वापरतात तर 'प्रकाशित' हा शब्द 'छापील' माध्यमांसाठी वापरतात. मला वाटते त्याला/तिला 'पुनश्च्य' म्हणावयाचे असेल.

आजकाल गप्पा मारतांनासुद्धा संभाषणात मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषेचे कडबोळे केले जाते याची पर्वा त्यांना नसते. हल्ली शाळेतील मुले-मुलीसुद्धा एकमेकांची वही मागताना 'तुझी नोटबुक दे' असे म्हणतात, पण त्याचवेळेस आपण मराठी इंग्रजीची सरमिसळ करून व्याकरणाचा चोळामोळा केला आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. अजूनही कित्येक जण 'आशीर्वाद' लिहिण्याऐवजी 'आर्शीवाद' असे लिहितात.

लिखित भाषा ही बोली भाषेपेक्षा नक्कीच वेगळी आहे व ती तशीच राहावी यातच भाषेचे वेगळेपण तसेच श्रीमंती आहे. अर्थात, भाषा कोणतीही वाईट नाही. भाषा हे संवादाचे, भावना मांडायचे माध्यम आहे, पण लेखी भाषा व बोली भाषेत थोडा का होईना फरक असतोच. लिहितांना आपण 'प्रश्न' लिहितो, मात्र बोलताना त्याचा उच्चार 'प्रष्ण' असाच करतो. हा फरक सूक्ष्म आहे, पण आहे. मराठी भाषेप्रमाणे इंग्रजी भाषेतही अशी अनेक उदाहरणे आहेत.

**-मिलिंद कल्याणकर,**
नेरूळ, नवी मुंबई.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

# कर्जतमध्ये ७२ वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीत वनराई बंधारे बांधून पाणी अडवण्याचे कार्य सुरु आहे. कर्जत पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतींमध्ये ७२ ठिकाणी आतापर्यंत वनराई बंधारे बांधले गेले आहेत. गट विकास अधिकाऱ्यांकडून प्रत्येक वनराई बंधाऱ्याची पाहणी केली जात असून आणखी वनराई बंधारे बांधण्यात यावेत, अशी सूचना ग्रामपंचायतींना करीत आहेत.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत कर्जत तालुक्यातील प्रत्यके ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधण्याची योजना आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेने रायगड जिल्ह्यात असा आगळावेगळा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यात कर्जत तालुक्यात ५५ ग्रामपंचायतींमध्ये वनराई बंधारे बांधले गेले आहेत. कोरड्या नद्या आणि नाल्यांतून वाहणारे पाणी अडवण्याचा प्रयत्न करून जमिनीतील भूजल पातळी वाढण्याचे कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरु आहे. या वनराई बंधारे क्षेत्रात वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्रामीण भागात स्यानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणा-या ग्रामपंचायतीस कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविण्यांकरीता, उत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदासाठी सन २०२५ – २६ या आर्थिक वर्षापासून तालुका जिल्हा महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरावर प्रोत्साहन देण्याकरिता मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान हे पुरस्कार अभियान योजना राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने कर्जत पंचायत समिती अंतर्गत एका दिवसात सर्व ५५ ग्रामपंचायतींमध्ये वनराई बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत मध्ये मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायरत अभियान अंतर्गत वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रत्येक गावातून जास्तीत जास्त बंधारे बांधण्याचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची प्रत्यक्ष पाहणी व वनराई बंधारा बांधण्यासाठी पंचायत समिती स्तरावरून गट विकास अधिकारी सुशांत पाटील, सहाय्यक गट विकास अधिकारी बापूसाहेब नंदाळे, कृषी अधिकारी संजय चव्हाण, विस्तार अधिकारी उज्वला भालेराव विस्तार अधिकारी विजय राजपूत तसेच सर्व ग्रामपंचायतींचा सहभाग होता.

प्रत्येक ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व ग्रामस्थ महिला बचत गटातील महिला, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी उस्फुर्त प्रतिसाद नोंदविला. 'या वेळी तालुक्यातील सर्वच ५५ ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला असून एकूण ७२ वनराई बंधारे केवळ श्रमदान व लोकसहभाग मधून बांधण्यात आले असून या बंधऱ्याच्या माध्यमातून भुजल साठा वाढविण्यास मदत होऊन जमिनीची धूप थांबविण्यास मदत होणार आहे, असे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी सांगितले.

## सद्भाव फाउंडेशनच्या वतीने टंचाईग्रस्त वाड्यांना पाणीवाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

सद्भाव फाउंडेशन मुंबई, कर्जत व खालापूर तालुक्यातील अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात. त्याचाच एक भाग म्हणून पाणी टंचाई ग्रस्त वाडयांना व गावांना पिण्याच्या पाण्याचे मोफत वाटप करण्यात येते. हा उपक्रम एप्रिल महिन्यापासून सुरू आहे. सदभाव फाउंडेशनच्या वतीने तालुक्यात अवेअरनेस शिबीर, कॅन्सरवर मार्गदर्शन शिबीर, महिला बचतगट असे अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात.

उन्हाळ्यात तालुक्यातील अनेक वाडयांना व गावांना पाणी टंचाई जाणवत असते. मदतीच्या भावनेतून फाउंडेशनच्या वतीने १७ वाडयांना व गावांना, चोचीवाडी, पट्टीची ठाकुरवाडी (उंबरवाडा)आनंदवाडी, खांदन पिंगळस,पोखरकरवाडी, वडाचीवाडी, पाधीरवाडी, टेपाचीवाडी, मेंगाळवाडी, जांभुळवाडी, वरणेठाकुरवाडी , पळसदरी वाडी ईस्टुलवाडी, ठाकूर वाडी, जांभुळवाडी, झुगरेवाडी या गावातील वाडयांना टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

सदभाव फाउंडेशनच्या विश्वस्त नीता दोषी यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहेत. त्या नेहमी दुसऱ्यांच्या भल्याचे विचार करत असतात. फाउंडेशनच्या कर्जत प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड आणि प्रगती पाटील, प्रतिक्षा दगडे, संतोष ढाकवळ या सर्वांचा यात अतिशय मोलाचा वाटा आहे. खेडेपाड्याात जावून त्यांच्या समस्या सोडवणे तसेच टंचाईग्रस्त गाव शोधणे यासाठी हे प्रयत्न करीत असतात.



## प्रवाशांच्या सेवेसाठी मुरूड-बोरीवली रातराणी एसटी सुरू



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड आगारातून रात्रीच्या वेळी मुरूड बोरीवली एसटी प्रवासासाठी सोडावा, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी राज्य परिवहन मंडळ रायगड विभागीय नियंत्रक व मुरूड आगार व्यवस्थापक यांच्याकडे महिन्यापुर्वी निवेदनाव्दारे केली होती.या निवेदनाची दखल घेत तसेच प्रवाशाचा विचार करुन राज्य परिवहन मंडळ रायगड विभागीय नियंत्रक सुहास चौरे यांनी मुरूड आगारातुन मुरूड बोरीवली रातराणी सोडावी, असा आदेश मुरूड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांना देण्यात आले होते. त्याच अनुषंगाने सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांच्या शुभ हस्ते मुरूड–बोरीवली एसटीला पुष्पहार अर्पण करून एसटी प्रवाशांसाठी सोडण्यात आली.

यावेळी मुरुड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर, कुणाल सतविडकर, चालक वसंत शिंदे, वाहक फिरोज शेख, शैलेश वारेकर, उल्हास मकु उपस्थित होते. कामासाठी मालाड, गोरेगाव, बोरीवली, दहिसर, कांदिवली येथे वास्तव्य करत असणाऱ्या तसेच बोरीवलीमधील स्थानिक रहिवाशी प्रवाशांना मुरूड–बोरीवली नविन रातराणी एसटीचा फायदा होणार आहे.

## माणगाव तालुक्याची जैवविविधता आली धोक्यात!

### वृक्षतोड, जलप्रदूषण आणि वणव्यांनी निसर्गाचा श्वास गुदमरला

**माणगाव : प्रतिनिधी**

एकेकाळी हिरव्यागार डोंगररांगा, स्वच्छ जलस्त्रोत, दाट जंगलं आणि समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखला जाणारा माणगाव तालुका आज पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. तालुक्यात सुरू असलेल्या जलप्रदूषण, अतिक्रमणे, नैसर्गिक जलस्त्रोत बंद करणे, बेछूट वृक्षतोड आणि वारंवार लागणारे वणवे यामुळे निसर्गाचे संतुलन ढासळत चालले असून पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.



पावसाचे पाणी अडवणारे नैसर्गिक मार्ग नष्ट होत आहेत. परिणामी भूजल पातळी घटत असून नद्या, तलाव, विहिरी, ओढे आणि झरे उन्हाळ्यात कोरडे पडू लागले आहेत. अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत चालली आहे. याशिवाय काही ठिकाणी नद्यांमध्ये आणि जलस्त्रोतांमध्ये बेकायदेशीर भराव टाकून त्यांचे प्रवाह रोखले जात असल्याचे चित्र आहे. माणगाव तालुक्याची जीवनवाहिनी काळ नदीच्या पात्रात मुंबई गोवा महामार्गाचे बायपास रस्ता करण्यासाठी आणि मोठे पुल उभारण्यासाठी मातीचे भराव टाकून कच्चे रस्ते तयार केले आहेत. काळ आणि गोद नदीच्या पाण्यावर माणगाव, निजामपूर, गोरेगाव आणि मोर्बा सहीत सुमारे १०० गावे अवलंबून आहेत. औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक प्रदूषणामुळे पाणी दूषित होत असून जलचर जीवसृष्टीवर गंभीर परिणाम होत आहेत. मासे, बेडूक, पक्षी आणि इतर अनेक जीवांच्या अधिवासावर याचा थेट परिणाम होत असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.

तालुक्यात वाढत चाललेल्या अतिक्रमणामुळे जंगल क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने पक्ष्यांचे निवासस्थान नष्ट होत आहे. उन्हाळ्यात वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे हजारो झाडे, औषधी वनस्पती आणि वन्यजीव भस्मसात होत आहेत. जंगलातील जैवविविधतेला हा मोठा धोका निर्माण झाला आहे. माणगाव तालुक्यातील निजामपूर, गांगवली परीसर हरीत पट्टा जाहीर केला असला तरी बेकायदेशीरपणे राजरोस अवैध मार्गाने अवैध मातीचे उत्खनन सुरू आहे. त्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणात धुप होत असल्याने माणगाव शहराला दरवर्षी महापुराचा सामना करावा लागतो. तसेच अनेक गावांचा संपर्क तुटतो.

मागील काही वर्षांत माणगाव तालुक्यात तापमानात लक्षणीय वाढ झाली असून उष्णतेची तीव्रता असह्य होत आहे. हवामानातील बदलामुळे शेती उत्पादनावर परिणाम होत असून शेतकरी चिंतेत आहेत. पावसाचे अनियमित प्रमाण, वाढते उकाडे आणि पाण्याचा तुटवडा यामुळे ग्रामीण जीवन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

“आज निसर्ग वाचवला नाही, तर उद्या माणसाचे अस्तित्वच धोक्यात येईल,” अशी भावना आता सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## मोरबा रोडवरील तुंबलेल्या गटारांमुळे पुराचा गंभीर धोका उद्भवण्याची भीती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मोरबा रोड परिसरात तुंबलेल्या गटारांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून येत्या पावसाळ्यात खांदाड, सिद्धी नगर आणि बामणोली रोड परिसरातील शेकडो घरांमध्ये पाणी शिरण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नगरपंचायत यांच्यातील तांत्रिक वादामुळे तब्बल पाच वर्षांपासून या गटारांची स्वच्छता आणि देखभाल रखडली असून नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेवर मोठे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही मोरबा रोडच्या दुतर्फा बांधण्यात आलेली गटारे आजही चिखल, प्लास्टिक, गवत आणि साचलेल्या घाणीने पूर्णपणे तुंबलेली आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी थेट रस्त्यावरून घरांकडे व शेतांकडे वळत आहे. गेल्या काही वर्षांपासून नागरिकांनी हा त्रास सहन केला असून प्रत्येक पावसाळ्यात घरात घुसणारे पाणी, दुर्गंधी आणि शेतीचे नुकसान यामुळे स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. २०२१ मध्ये दिघीमाणगावपुणे हा सुमारे १६० किलोमीटरचा महामार्ग तब्बल २७० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आला.

महामार्ग उभारल्यानंतर परिसराचा विकास होईल, वाहतूक सुलभ होईल आणि नागरिकांना सुविधा मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात रस्त्यालगत बांधण्यात आलेल्या गटारांची योग्य रचना आणि निचऱ्याची व्यवस्था नसल्याने हा विकासच आता स्थानिकांसाठी संकट ठरत आहे.



महामार्ग बांधून पाच वर्षे उलटून गेली तरी गटारांची जबाबदारी नेमकी कोणाची, यावरून संबंधित विभागांमध्ये वाद सुरू असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नगरसेवक प्रशांत साबळे यांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने ठोस कारवाई केलेली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे. खांदाड, सिद्धी नगर आणि बामणोली रोड हा परिसर पावसाळ्यात अतिसंवेदनशील मानला जातो. हा भाग पुरनियंत्रण रेषेत येत असल्याने येथे बांधकामांवर अनेक निर्बंध आहेत. मात्र दुसरीकडे महामार्गासाठी करण्यात आलेल्या मातीच्या भरावामुळे अनेक नैसर्गिक जलमार्ग आणि पाण्याचे स्त्रोत बंद झाले आहेत. परिणामी पावसाचे पाणी वाहून जाण्याचा मार्गचच बंद झाल्याने संपूर्ण परिसर जलमय होण्याची भीती आता निर्माण झाली आहे. याचा सर्वाधिक फटका स्थानिक शेतकऱ्यांना जास्त बसत आहे. गटारांतील आणि पावसाचे पाणी थेट शेतात घुसत असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेकांची शेती दरवर्षी नापिक होत असून आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. दुसरीकडे घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना संसारोपयोगी वस्तू, अन्नधान्य आणि घरांचे नुकसान सहन करावे लागत आहे.

विशेष म्हणजे या गटारांना योग्य आउटलेटच नसल्याने साचलेले पाणी अनेक दिवस तुंबून राहते. त्यामुळे परिसरात कायम दुर्गंधी पसरलेली असते. डासांचे प्रमाण वाढून आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. नागरिकांना अस्वच्छतेसोबत संसर्गजन्य आजारांचा धोका देखील निर्माण झाला आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या मते महामार्ग आणि गटार बांधल्यानंतर त्यांची किमान पाच वर्षे देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित महामंडळाची असते. मात्र प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षांत कोणतीही नियमित स्वच्छता किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी गटारे अर्धवट अवस्थेत असून त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. येत्या मुसळधार पावसापूर्वी प्रशासनाने तातडीने मोरबा रोडवरील गटारे स्वच्छ करून पाण्याचा योग्य निचरा करण्याची व्यवस्था करावी, अन्यथा खांदाड, सिद्धी नगर आणि बामणोली रोड परिसरातील ग्रामस्थ तीव्र आंदोलन छेडतील, असा कडक इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## मुख्याध्यापकपदी दिलीप उभारे यांची नियुक्ती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी म्हणजे अशोक दादा साबळे विद्यालय व माणगाव जुनिअर कॉलेजच्या प्रभारी मुख्याध्यापकपदी दिलीप सखाराम उभारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक १ मे २०२६ पासून त्यांनी या पदाची सूत्रे स्वीकारली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा आणि बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.



शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव, विद्यार्थ्यांविषयी असलेली आत्मीयता, शिस्तप्रिय कार्यपद्धती आणि प्रशासनातील समन्वय कौशल्य यामुळे श्री. उभारे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यालय व जुनिअर कॉलेजची शैक्षणिक गुणवत्ता, संस्कारमूल्ये आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जातील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या नियुक्तीबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, संस्थेचे सेक्रेटरी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, सेक्रेटरी कृष्णा गांधी, सर्व संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उभारे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत संस्थेच्या प्रगतीसाठी नेतृत्वाचा लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. उभारेंच्या नियुक्तीमुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण असून विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक बदल घडवतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चौल येथे करिअर मार्गदर्शन शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथील पाठारे क्षत्रीय समाज सभागृहात आयोजीत करिअर मार्गदर्शन शिबिरास विद्यार्थी व पालकवर्ग यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीच करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे प्रतिपादन जि.प.सदस्य तथा माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांनी केले.

चौल व बेलोशी जिल्हा परिषद क्षेत्रातील इयत्ता १० वी व १२ वी बोर्डाची परिक्षा दिलेल्या विदयार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विशेष उपक्रम म्हणून दिलीप भोईर चॅरिटेबल ट्रस्ट झिराड–अलिबाग यांचे माध्यमातून करिअर मार्गदर्शन शिबिर उत्कर्ष फाउंडेशन यांचे सहकार्याने शनिवार २३ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १चे दरम्यान चौल पाठारे क्षत्रिय समाज सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरास जि.प.सदस्य तसेच माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीसह जि.प.सदस्य डॉ.सचिन राउळ, पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, पंचायत समिती सदस्या अंकिता घरत, पंचायत समिती सदस्य संतोष निगडे, खानाव ग्रा.पं.माजी सरपंच जितेंद्र गोंधळी, दिपक मोकळसर, रवी नाईक सर, पाठारे क्षत्रीय समाज अध्यक्ष रमेश म्हात्रे, युवा नेतृत्व हर्षल घरत, योगेश पिटनाईक, युवासेना अधिकारी हर्षल घरत, शलाका राउत, अंकुश घरत आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मोठ्या संख्येने चौल व बेलोशी जिल्हा परिषद गणातील विद्यार्थी व पालकवर्ग यांची उपस्थिती होती.

# आयुक्त डॉ.कैलास शिंदेंची सायकलवरून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान महोदयांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशवासियांना केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सकाळी ६ पासून ९ वाजेपर्यंत बेलापूर व नेरूळ विभागात अधिका-यांसमवेत सायकल चालवत पाहणी दौरा केला.



नेरूळ सेक्टर १ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून पाहणीला सुरूवात करीत शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे, ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसर, सीवूड रेल्वेवरील उड्डाणपूल, पारसिक हिल, इन्कम टॅक्स कॉलनी, आग्रोळी येथील जलउदंचन केंद्र अशा विविध भागातील स्वच्छता, शौचालये, उद्याने, मार्केट, सायकल ट्रॅक, पम्प हाऊस अशा विविध बाबींची त्यांनी सायकलवर पाहणी करीत आवश्यक त्या ठिकाणी थांबत संबंधित अधिका-यांना सुधारणांविषयक मौलिक सूचना केल्या.

विशेषत्वाने शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे अशा गावांच्या परिसराची पाहणी करताना तेथील स्वच्छतेमध्ये अधिक सुधारणा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. गावठाणांच्या बाजूला असलेल्या सेक्टर भागातही स्वच्छतेवर अधिक भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

शिरवणे जुईनगरच्या चिंचोली उद्यानाची सुधारणा करावी असे निर्देशित करतानाच तेथील शौचालय सुस्थितीत असून त्याप्रमाणे इतर शौचालयांची स्थिती ठेवावी असे त्यांनी सूचित केले. विशेषत्वाने पाम बीच रोडवर वझिराणी स्पोर्ट्सच्या कॉर्नरला पुढे असलेले शौचालय काहीसे पाठीमागे सरकवावे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

सारसोळे येथील आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आसपासच्या परिसराची स्वच्छता करून घ्यावी तसेच त्याठिकाणचे मार्केटचे काम लवकरात लवकर करून ते उपयोगात आणावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले. करावे गावाच्या कॉर्नरलाही नागरिकांची गरज लक्षात घेऊन मार्केट बनविण्याचे त्यांनी सूचित केले.

काही ठिकाणी रिकाम्या प्लॉटवर नागरिक कचरा आणून टाकतात हे पाहणी दरम्यान लक्षात येताच त्याला प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना कराव्यात तसेच ते प्लॉट स्वच्छ करून घ्यावेत असे आयुक्तांनी निर्देश दिले. सेक्टर २८ आग्रोळी येथे पारसिक हिलच्या पायथ्याशी असणा-या पम्प हाऊसची तसेच स्काडा प्रणालीची बारकाईने पाहणी करीत आयुक्तांनी काही सुधारणा सुचविल्या.

पंतप्रधान महोदयांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सकाळच्या सत्रात सायकलवरून पाहणी केल्याने शहरातील सेवा-सुविधांचा प्रत्यक्ष ग्राऊंड रिपोर्ट जाणून घेता येतो व पाहणीत सायकलचा वापर केल्याने शारीरिक तंदुरूस्तीसाठी आरोग्याच्या दृष्टीनेही फायदा होतो असा दुहेरी लाभ सायकलवरून पाहणी दौ-यात होतो असा अप्रत्यक्ष संदेश या दौ-यातून प्रसारित झाला.

# वनमंत्र्यांच्या भूमिकेचे पर्यावरणप्रेमींकडून स्वागत

## एनआरआय पाणथळ जागेच्या सुरक्षिततेसाठी वन कर्मचारी तैनात

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी अलीकडेच घेतलेल्या किनारी पाणथळ जागा या खारफुटी परिसंस्थेचाच एक भाग आहेत या भूमिकेमुळे, मुंबई महानगर प्रदेशातील पाणथळ जागांच्या संवर्धनाबाबत खारफुटी कक्ष आणि वन विभागाच्या दृष्टिकोनात एक महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह बदल घडून आला आहे. या बदलाचे तसेच वनमंत्री गणेश नाईक यांनी घेतलेल्या भूमिकेचे नवी मुंबईतील पर्यावरण प्रेमी संघटनांनी स्वागत केले आहे.



यापूर्वी, किनारी पाणथळ जागांचा विनाश आणि अतिक्रमणासंबंधीच्या तक्रारी या खारफुटी कक्षाच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत असे उत्तर पर्यावरण प्रेमी तसेच कांदळवन व पाणथळ जागा वाचविण्यासाठी धडपडणाऱ्या पर्यावरण प्रेमींना दिले जात असे. त्यामुळे हे आक्षेप तक्रारी नेहमी फेटाळले जात होते. त्यामुळे लढायचे आवाज उठवायचा दाद मागायची तरी कोणाकडे असा प्रश्न सदैव पर्यावरण प्रेमींना पडत होता. तथापि, आता वनमंत्री गणेश नाईक यांच्या पाणथळ जागा व कांदळवन क्षेत्र बचावासाठी घेतलेल्या ठाम भूमिकेने परिस्थितीत सकारात्मक बदल होताना दिसत आहे. वन विभागाने या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील पाणथळ जागांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी सक्रियपणे हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली आहे.

याचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे, ठाण्यासह नवी मुंबईतील काही पाणथळ जागांना वादग्रस्तपणे 'पाणथळ जागा नाहीत' असे घोषित केल्यानंतर, खारफुटी कक्षाने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील ठाणे जिल्हा पाणथळ समितीला अतिशय कडक शब्दात पत्र दिले असून, निर्णय घेताना आम्हाला कळवले जात नसल्याचे म्हटले आहे. यामुळे ज्या जागा रिअल इस्टेट लॉबीकडून धोक्यात येण्याची शक्यता होती.

**एनआरआय पाणथळ क्षेत्राला वन विभागाचे संरक्षण**

एनआरआय पाणथळ प्रदेशात सध्या फ्लेमिंगो पाहण्यासाठी गर्दी होत आहे.एकीकडे या पाणथळ क्षेत्रातील पाण्याचे प्रवाह अडवले जात आहेत. हे पाणथळ क्षेत्र पाण्याअभावी सुकवून ते क्षेत्र भुखंड म्हणून विकासकांच्या घशात घालण्याचा डाव सिडकोकडून रचला जात आहे. त्यासाठी विविध शासकीय यंत्रणा काम लागल्या आहेत. मात्र पर्यावरण प्रेमी हा डाव हाणून पाडत आहेत. त्यासाठी खुद्द वनमंत्री गणेश नाईक यांचा देखील ठाम पाठिंबा पर्यावरण प्रेमींना मिळू लागला आहे.

# सहाय्यक गटविकास अधिकारी, उपलेखापाल पदांसाठी परीक्षा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विकास सेवा अंतर्गत सहाय्यक गट विकास अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना संबंधित पदावर कायम करण्यासाठी, तसेच जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनासाठीच्या विभागीय परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. कोकण विभागाच्या अप्पर आयुक्त कार्यालय (आस्थापना) यांच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे. या परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ रोजी पार पडणार असून, यासाठी नवीन पनवेल येथील एका प्रमुख परीक्षा केंद्राची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विकास सेवा सहाय्यक गट विकास अधिकारी (गट-ब) या पदावरील उमेदवारांच्या स्थिरीकरणासाठीची परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत घेतली जाईल. याच सोबतीने जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी आणि नामनिर्देशनाव्दारे थेट नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीची विहित परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या दोन दिवसांत घेतली जाणार आहे. या दोन्ही महत्त्वाच्या परीक्षा नवीन पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील "चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय" या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आल्या आहेत.

या सर्व परीक्षांचे प्रवेश पत्र (हॉल तिकीट) संबंधित विभागीय आयुक्तांकडे आधीच रवाना करण्यात आले आहेत. ज्या उमेदवारांना काही कारणास्तव अद्याप परीक्षेचे प्रवेश पत्र प्राप्त झाले नसेल, त्यांनी विनाविलंब आपल्या संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाशी त्वरित संपर्क साधून ते मिळवून घ्यावे. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या महत्त्वपूर्ण तारखांची आणि सूचनांची नोंद घेऊन वेळेत परीक्षेला उपस्थित राहावे, असे आवाहन कोकण विभागाचे अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये स्वस्त प्लॉटचे आमिष दाखवून 'फार्म एन लँड'कडून ३० लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात कमी दरात जमीन व प्लॉट मिळवून देण्याचे आमिष दाखवत सहा गुंतवणूकदारांची तब्बल ३० लाख रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी 'फार्म एन लँड' कंपनीचा संचालक रवींद्र रोहिदास नायक याच्याविरोधात सानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, याच आरोपीविरोधात यापूर्वीही अशाच प्रकारच्या आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून त्याला अलीकडेच अटक करण्यात आली होती.

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या आर्थिक गुप्तवार्ता कक्षाला 'फार्म एन लँड' कंपनीमार्फत जमीन विक्रीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सानपाडा येथील सेक्टर ३० ए मधील जी स्क्वेअर बिझनेस पार्कमधील कंपनीच्या कार्यालयाची आणि संबंधित व्यवहारांची पडताळणी करण्यात आली.



तपासादरम्यान काही गुंतवणूकदारांकडून लाखो रुपये स्वीकारूनही जमीन त्यांच्या नावावर करण्यात आलेली नसल्याचे उघड झाले. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी रवींद्र नायक याने सोशल मीडियासह विविध माध्यमांतून पनवेल परिसरात कमी दरात प्लॉट उपलब्ध असल्याच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या होत्या. प्रति गुंठा अडीच लाख ते साडेतीन लाख रुपयांत जमीन मिळणार असल्याचे सांगून गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात आले.

त्यानंतर संबंधितांना साई-पनवेल परिसरातील जागांची पाहणी करून देण्यात आली. काही प्रकरणांत शेतकऱ्यांसोबत व्यवहार सुरू असल्याचे भासवून विश्वास संपादन करण्यात आला. गुंतवणूकदारांकडून पूर्ण रक्कम स्वीकारल्यानंतर जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया मात्र पुढे नेण्यात आली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधितांना जमीन ताब्यात मिळाली नाही किंवा व्यवहार पूर्ण करण्यात आला नाही. या प्रकारात सहा गुंतवणूकदारांची एकूण ३० लाख ९ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी सानपाडा पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, आरोपी रवींद्र नायक याच्याविरोधात यापूर्वी सीबीडी बेलापूर पोलिस ठाण्यातही अशाच प्रकारच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या प्रकरणात त्याला १४ मे रोजी अटक करण्यात आली होती. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना जमीन किंवा प्लॉट खरेदीपूर्वी संबंधित कागदपत्रांची शहानिशा करण्याचे तसेच आकर्षक दरांच्या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

# सोसायटीतील झाड छाटणीसाठी शुल्क रद्द करण्याची नगरसेवक कुरकुटे यांची मागणी

**नवी मुंबई :बातमीदार , प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थांमध्ये झाडांच्या छाटणीसाठी आकारण्यात येणारे प्रति झाड रुपये २०० एनओसी शुल्क तात्काळ रद्द करून नागरिकांना मोफत झाड छाटणी सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रभाग क्र. १९ सानपाडा येथील भाजपाचे नगरसेवक सुनील कुरकुटे यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

यासंदर्भात कुरककुटे यांनी आयुक्तांना ई-मेल तसेच प्रत्यक्ष लेखी निवेदन करत मागणी सादर केली. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नवी मुंबईतील अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष असून पावसाळ्याच्या काळात वाढलेल्या फांद्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. अनेक वेळा फांद्या पडून अपघात, वीज वाहिन्यांचे नुकसान, वाहतूक अडथळे तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याच्या घटना घडतात. महानगरपालिकेमार्फत झाडांच्या छाटणीसाठी प्रति झाड २०० रुपये प्रमाणे एनओसी शुल्क आकारले जात असताना प्रत्यक्ष छाटणीचा खर्च मात्र संबंधित गृहनिर्माण संस्थांकडून केला जातो. त्यामुळे हे शुल्क म्हणजे नागरिकांवर अतिरिक्त

> नागरिकांची सुरक्षा ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून झाड छाटणीसारख्या महत्त्वाच्या सेवांवर आर्थिक बोजा टाकण्याऐवजी महानगरपालिकेने नागरिकांना दिलासा देणारा निर्णय घ्यावा,"
>
> **-नगरसेवक सुनील कुरकुटे**

आर्थिक भार असून सामान्य नागरिकांची अप्रत्यक्ष लूट असल्याचे नगरसेवक सुनील कुरकुटे यांनी म्हटले आहे.नवी मुंबईतील नागरिक नियमितपणे प्रॉपर्टी टॅक्स तसेच विविध महानगरपालिका कर भरत असताना सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित मूलभूत सेवांसाठी स्वतंत्र शुल्क आकारणे अन्यायकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी नगरसेवक सुनील कुरकुटे यांनी पुढील मागण्या प्रशासनाकडे केल्या -

प्रति झाड आकारण्यात येणारे २०० रुपये एनओसी शुल्क तात्काळ रद्द करावे. महानगरपालिकेमार्फत मोफत झाड छाटणी सेवा सुरू करावी. पावसाळ्यापूर्वी शहरव्यापी धोकादायक झाड तपासणी व छाटणी मोहीम राबवावी. नागरिकांसाठी सुलभ तक्रार नोंदणी व हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करावी.

## करपली भाकर कथासंग्रहाला पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्रामीण साहित्य क्षेत्रातील मानाचा व प्रतिष्ठाचा समजले जाणारा वैशाखी वादळवारा या संस्थेच्या वतीने दिले जाणारा सुरेश मिटकरी स्मृती कथा गौरव राज्यस्तरीय साहित्य २०२६ चा उत्कृष्ट वाड्मय कथा संग्रह विभागाचा पुरस्कार नवी मुंबईतील साहित्यिक उत्तम तरकसे यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला मिळाल्याचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जोगदंड यांनी जाहीर केले.सदरचा पुरस्कार हा लवकरच म्हणजे रविवार दिनांक ७ जून २०२६ रोजी एस एम जोशी फाउंडेशन पत्रकार भवन शेजारी गांजवे चौक नवी पेठ पुणे येथे ग्रामीण साहित्यिक समाजभूषण उत्तमराव तरकसे यांना मान्यवराच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

# नवी मुंबई ते चिरनेर दिघोडेमार्गे वशेणी एनएमएमटीची बससेवा सुरू करण्याची मागणी

**उरण : वार्ताहर**

जेएनपीए बंदर,अटल सेतू आणि नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण पुर्व विभागातील गावांचा झपाट्याने विकास वाढत असून नागरिकरण ही झपाट्याने वाढत आहे.मात्र नवीमुंबई शहराकडे ये- जा करण्यासाठी प्रवासी वाहनांची सुविधा उपलब्ध नसल्याने कॉलेज, महाविद्यालय येथे जाणारे विद्यार्थी, नोकरदार, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण त्यांचे नातेवाईक मंडळीची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.तरी नवीमुंबई ते चिरनेर दिघोडे मार्गे वशेणी एन एम एम टी ची बस सेवा सुरु करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात असून त्यासाठी चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर,मोठी जुई, कळंबुसरे,कोप्रोली,पिरकोन,सारडे , वशेणी येथील सरपंचांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



उरण, पनवेल एस टी बस आगार व्यवस्थापनाने उरण शहराकडे व उरण पुर्व विभागातील गावांकडे ये- जा करणाऱ्या एसटी बसची संख्या कमी केल्याने त्याचा सर्वाधिक त्रास हा विद्यार्थी, चाकरमानी, प्रवाशी नागरिकांना होतच आहे.त्यात नवीमुंबई ते कोप्रोली मार्गे वशेणी कडे जाणारी एन एम एम टी ची बस सेवा काही कारणाने बंद पडल्याने या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागत आहेत.अशातच नवीमुंबई ते उरण शहराकडे ये- जा करणारी एन एम एम टी ची बस सेवा सुरू असल्याने निश्चित त्याचा सर्वाधिक फायदा हा सर्वसामान्य नागरिकांना होत असून त्यांचा पैसा आणि वेळ वाचत आहे.

त्यात पनवेल कडे ये- जा करणाऱ्या एसटी बसची संख्या पनवेल बस आगार व्यवस्थापकांनी कमी केल्याने त्याचा नाहक त्रास हा नवीमुंबई, पनवेल या महत्त्वाच्या शहरांकडे ये- जा करणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक मंडळी यांना सहन करावा लागत असून तासनतास गाडीची वाट बघावी लागते तसेच प्रवाशांसाठी जादा पैसे मोजावे लागत आहे.सध्या जेएनपीए बंदर,अटल सेतू आणि नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण पुर्व विभागातील गावांचा झपाट्याने विकास वाढत असून नागरिकरण ही वाढत आहे.मात्र नवीमुंबई शहराकडे ये- जा करण्यासाठी प्रवासी वाहनांची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थी, चाकरमानी, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण, नातेवाईक मंडळीची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

तरी नवीमुंबई ते दिघोडे चिरनेर मार्गे वशेणी एन एम एम टी ची बस सेवा सुरु करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.त्यासाठी चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर,मोठी जुई, कळंबुसरे,कोप्रोली,पिरकोन,सारडे , वशेणी,केळवणे येथील सरपंचांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी भरमसाठ शुल्काची वसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील अनेक खाजगी शाळांकडून विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला म्हणजेच लिव्हिंग सर्टिफिकेट, ट्रान्स्फर सर्टिफिकेट देताना पालकांकडून ५ हजार ते १० हजार रुपयांपर्यंत पर्यंत शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. नोकरीमुळे स्थलांतर, आर्थिक अडचणी किंवा इतर कारणांमुळे शाळा बदलणाऱ्या पालकांना याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे.या संदर्भात नगरसेवक गणेश सकपाळ यांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे अधिकृत निवेदन वजा तक्रार देत संबंधित खाजगी शाळांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

यावेळी नगरसेवक गणेश सकपाळ म्हणाले, "शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार आहे. शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी पालकांकडून हजारो रुपये आकारणे पूर्णपणे अन्यायकारक आहे. आधीच शिक्षणाचा खर्च सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर जात असताना अशा प्रकारे आर्थिक लूट होणे थांबले पाहिजे. पालकांनी कुठल्याही प्रकारचे अवैध शुल्क भरू नये आणि अशा प्रकारच्या तक्रारी तात्काळ शिक्षण विभागाकडे कराव्यात.तसेच शिक्षण विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन सर्व खाजगी शाळांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

> मला स्वतःला हा कोपरखैरणेमधील शाळेचा अनुभव आला आहे. याच विभागातील दुसऱ्या एका शाळेने देखील अशीच शुल्क वसुली सुरू ठेवली आहे. एकीकडे ॲडमिशन घेताना डोनेशन घेतात फी घेतात व लिव्हिंग सर्टिफिकेटसाठी देखील फी घेऊन या शाळा लुटत आहेत. मी नगरसेवक आहे म्हणून मला म्हणाले की, तुम्ही लेटर द्या आम्ही शुल्क माफ करतो. शुल्क माफ करायला या शाळा स्वतःला काय समजतात? मग जर फीच्या बाबतीत पालकांनी या शाळांना शुल्क माफीचे पत्र दिल्यास, या शाळा फी माफ करणार का? तेव्हा एक रुपया सोडत नाहीत. पालकांचेचा पैसे घेऊन पालकांवर उपकार केल्यासारखे शाळा वागत आहेत? यावर शिक्षण विभागाने कठोरपणे तपासणी करून शाळांना अद्दल घडवावी अन्याय आंदोलन छेडले जाईल.
>
> **-गणेश सकपाळ,** नगरसेवक, भाजपा

# प्रमोद शेवाळे नवी मुंबईचे अप्पर पोलीस आयुक्त

**पनवेल : वार्ताहर**

राज्याच्या गृह विभागाने पोलीस प्रशासनात केलेल्या मोठ्या फेरबदलानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात मोठा खांदेपालट झाला आहे. शहरात नव्याने दाखल झालेल्या पाचही पोलीस उपायुक्तांच्या नियु‍त्यांचे आदेश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी जारी केले आहेत. यामध्ये परिमंडळ-१, ३, वाहतूक शाखा आणि विशेष शाखा यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विभागांचा समावेश असून, या बदल्यांमुळे शहराच्या कायदा-सुव्यवस्थेला नवीन दिशा देण्यासाठी पोलीस आयुक्तांनी आपल्या नव्या टीमसोबत कंबर कसली आहे.

नवी मुंबईत रुजू झालेल्या पाचही उपायुक्तांना त्यांच्या पूर्वानुभवाचा विचार करुन पोलीस आयुक्तांनी महत्त्वाच्या विभागांचे वाटप केले आहे. गेल्या काही दिवसांपासून रिक्त असलेल्या अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या अत्यंत महत्त्वाच्या पदाचा सस्पेन्स अखेर संपला आहे.

राज्याच्या गृह विभागाने पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या असून, यात प्रमोद शेवाळे यांची दहशतवाद विरोधी पथकातून (एटीएस) थेट 'नवी मुंबई'चे नवे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर वर्णी लागावी यासाठी राज्यातील अनेक वरिष्ठ पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरु होती. गुन्हे शाखेचा सदर महत्त्वपूर्ण कारभार कोणाच्या हातात जातो, याची उत्सुकता संपूर्ण पोलिस दलाला लागली होती. अखेर गृह विभागाने प्रमोद शेवाळे यांची त्या पदावर नियुक्ती करुन पूर्णविराम दिला आहे.

# धोकादायक व अनधिकृत होर्डिंग्जवर सिडकोचा हातोडा

**नवी मुंबई : बातमीदार**

वादळी वारा आणि पावसाच्या पार्श्वभूमीवर सिडकोच्या नैना विभागाने नैना क्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग्ज वर तोडक कारवाई सुरू केली आहे.

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नैना) विभागामार्फत दिनांक १४ मे रोजी गोवा हायवे वरील मौजे शिरढोण येथील पाटील स्नॅक्स, सर्व्हे नंबर १६ व कर्नाळा हॉटेल जवळील सर्व्हे नंबर- ३६/२ , तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील बांधकामधारकास अनुक्रमे दिनांक २२ मे २०२४ व दिनांक ०३ जून २०२४ रोजी नोटीस देण्यात आल्या होत्या. सदर बांधकामधारकाने विनापरवानगी उभारलेले अवाढव्य जाहिरात फलक निष्कासन मोहिम राबवून तोडण्यात आले.वर नमूद अनधिकृत जाहिरात फलक मुंबई - गोवा राष्ट्रीय मार्गाच्या शेजारी उभारण्यात आला होता. सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन व सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता उभारण्यात आले असल्यामुळे निष्कासित करण्यात आले.

सदरची मोहीम मुख्य दक्षता अधिकारी तथा पोलिस उप महानिरीक्षक सुरेश मेंगडे, यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नैना) प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी दत्तात्रय चौरे, जितेंद्र परदेशी व भूमापक शिवराज चव्हाण, नवनाथ नारबट ,स्थानिक पोलिस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे राबविण्यात आली. या कारवाईसाठी ०१ सुपर वायझर,१० लेबर , ०१ क्रेन , ०१ हायड्रा , ०१ ट्रक , ५ जीप, ०२ गॅस कटर वापरण्यात आले.

# नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र वांगणीला हलविण्याचा डाव; ग्रामस्थांचा संताप





**नागोठणे : बतामीदार**

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र वांगणीआमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेम कंपनीच्या इमारतीत स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येताच नागोठणे परिसरात खळबळ उडाली आहे. आरोग्य केंद्रातील गैरसोयींचे कारण पुढे करत शासकीय स्तरावर हे केंद्र हलविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. याविरोधात नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया संजय महाडिक व उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनी तीव्र विरोध दर्शवत संबंधित विभागाशी पत्रव्यवहार सुरू केला आहे.

रोहा पंचायत समितीच्या तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिनांक १८ मे २०२६ रोजी सुप्रीम पेट्रोकेम कंपनी व्यवस्थापनाला नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र भाड्याच्या जागेत स्थलांतरित करण्यासंदर्भात पत्र पाठवल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे शासनस्तरावर हालचाली सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे, आरोग्य केंद्र दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे सांगणाऱ्या प्रशासनाकडे भाड्याच्या जागेसाठी निधी कसा उपलब्ध होणार? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

मुंबईगोवा महामार्गावरील महत्त्वाचे व मध्यवर्ती असलेले नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित झाल्यास आसपासच्या गावांतील नागरिक, आदिवासी वाड्यांतील रुग्ण, गरोदर माता, बालकांचे लसीकरणासाठी येणारे पालक यांना मोठा त्रास सहन करावा लागेल, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. खासगी वाहनांचा खर्च वाढण्यासोबतच औषधोपचारासाठीही अडचणी निर्माण होणार असल्याचे सांगण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.२२) नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सरपंच सुप्रिया महाडिक व उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता नाईक यांच्यासोबत बैठक घेत स्थलांतराच्या प्रस्तावाला कडाडून विरोध दर्शविला. बैठकीस ग्रामपंचायत सदस्य संतोष नागोठणेकर, सदस्या शबाना मुल्ला, ज्योती राऊत यांच्यासह ग्रामस्थ व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

"नागोठणे ग्रामपंचायतीला विश्वासात न घेता आरोग्य केंद्र स्थलांतरित करण्याचा निर्णय मान्य होणार नाही. नागरिकांच्या सुविधेचा विचार करून हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा," अशी ठाम भूमिका उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनी व्यक्त केली.दरम्यान, सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या पाठपुराव्यानंतर रोहा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका साळुंके यांनी ग्रामपंचायतीत भेट देत पर्यायी जागेबाबत चर्चा केली आहे .

# माणगावात विजेच्या लपंडावामुळे तीव्र पाणीटंचाई

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला वीजेचा लपंडाव आता नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यावर गंभीर परिणाम करू लागला आहे. भर उन्हाळ्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शहरात तांत्रिक पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांचे हाल असह्य झाले आहेत. घराघरात पाण्यासाठी प्रतीक्षा, टाक्यांमध्ये कोरडेपणा आणि अंधारात चाचपडणारे नागरिक असे चिंताजनक चित्र सध्या माणगाव शहरात पाहायला मिळत आहे.

मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असलेल्या माणगाव शहरासाठी स्वतंत्र लाईट फिडरची मागणी गेली अनेक वर्षे सातत्याने होत आहे. मात्र प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून ठोस पावले उचलली जात नसल्याने शहरवासीयांचा संताप वाढत चालला आहे. दररोज अचानक वीज खंडित होत असल्याने पाणीपुरवठा यंत्रणा विस्कळीत होत आहे. परिणामी नागरिकांना अनेक तास पाण्याची प्रतीक्षा करावी लागत असून महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

वीज वितरण कंपनीच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, स्वतंत्र लाईट फिडर म्हणजे विद्युत उपकेंद्रापासून थेट शहरासाठी देण्यात येणारी विशेष वीजवाहिनी असते. या फिडरवर कृषी किंवा इतर व्यावसायिक भार नसल्याने व्होल्टेज ड्रॉपची समस्या उद्भवत नाही. त्यामुळे शहराला अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळू शकतो. तसेच दुरुस्ती किंवा देखभालीच्या वेळी संपूर्ण शहर अंधारात न ठेवता नियंत्रित पद्धतीने काम करता येते. परंतु माणगाव शहराला आजही ही मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने प्रत्येक छोट्या बिघाडाचा फटका हजारो नागरिकांना बसत आहे.

सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून पाण्याची गरज सर्वाधिक असताना वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा केंद्रे बंद पडत असून अनेक भागात पाणी वेळेवर पोहोचत नाही. काही ठिकाणी नागरिकांना रात्री उशिरापर्यंत नळाला पाणी येण्याची वाट पाहावी लागत आहे. "वीज गेली की पाणी बंद आणि पाणी बंद म्हणजे संपूर्ण दिवस विस्कळीत," अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

# मुख्यमंत्री पंचायतराज अभियानात अलिबागमधिल वाडगाव ग्रुप ग्रामपंचायत प्रथम

**अलिबाग ,रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठेच्या 'मुख्यमंत्री पंचायतराज अभियान पुरस्कार' अंतर्गत रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात ग्रुप ग्रामपंचायत वाडगावने बाजी मारली आहे.

अधिकृत मूल्यमापनानुसार, वाडगाव ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी करत अलिबाग तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे संपूर्ण तालुक्यात वाडगाव ग्रामपंचायतीचे कौतुक होत आहे.

ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे, विकासकामांना गती देणे आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत यशस्वीरित्या पोहोचवणे या उद्देशाने मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत दरवर्षी मूल्यमापन केले जाते.

प्रसिद्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, वाडगाव ग्रामपंचायतीला एकूण ९१ गुणांपैकी ८५.६३ गुण मिळाले असून, त्यांची टक्केवारी ९४.०९% इतकी राहिली आहे. अलिबाग तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींच्या तुलनेत ही कामगिरी सर्वोत्तम ठरली आहे. वाडगाव पाठोपाठ मापेगाव ग्रामपंचायतीने ९१ पैकी ७९.३४ गुण (८७.१८%) मिळवून द्वितीय स्थान मिळवले आ

हे.वाडगाव ग्रामपंचायतीने पाणीपुरवठा, स्वच्छता, डिजिटल प्रशासन, कर वसुली, आणि पर्यावरणपूरक उपक्रम या सर्वच आघाड्यांवर उत्कृष्ट काम केल्याचे या गुणांवरून स्पष्ट होते.

सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक आणि वाडगावच्या ग्रामस्थांनी घेतलेल्या सामूहिक परिश्रमांचे हे फलित असल्याची भावना स्थानिक पातळीवर व्यक्त केली जात आहे.

या यशाबद्दल बोलताना उपसरपंच सरिता भगत यांनी सांगितले की, "मुख्यमंत्री पंचायतराज अभियानातील हा प्रथम क्रमांक वाडगावच्या शाश्वत विकासाची साक्ष देतो. प्रशासकीय शिस्त आणि लोकसहभाग यांच्या जोरावर आम्ही हे यश संपादन करू शकलो. आगामी काळात वाडगावला एक आदर्श आणि स्वयंपूर्ण गाव बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."



# मुरूड शहरात पावसाची हजेरी

**मुरुड : प्रतिनिधी**

मे महिन्यातच मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली असून मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागात अनेक ठिकाणी रिमझिम पाऊसाला सुरुवात झाली असून पूर्व पावसाच्या रिमझिम सरींमुळे उकाड्यातून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सकाळपासून ढगाळ वातावरण असून अधूनमधून हलक्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. त्यामुळे तापमानात घट झाली असून वातावरण आल्हाददायक झाले आहे. शेतकऱ्यांमध्येही समाधानाचे वातावरण असून खरीप हंगामाच्या तयारीला सुरुवात होणार आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

# अतिक्रमण हटवून वाढीव गावठाणांची मागणी

## चौक माणिवली ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक माणिवली स.नं. २७ या शासनाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून ते त्वरीत हटवून त्या ठिकाणी वाढीव गावठाण करून गरजूंना घरे बांधण्यासाठी प्लॉट उपलब्ध करून द्यावे, असे निवेदन चौक माणिवली ग्रामस्थ यांच्या वतीने खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांना देण्यात आले.



चौक माणिवली स.न.२७ ही राज्य सरकारची मोकळी जागा आहे.या जागेचा वापर भात शेतीची कामे, भात साठवण, गुरे बसवणे अशा साठी येथील शेतकरी जागेचा वापर करीत असतं. सन १९८२ साली शासनाने यातील काही जागेवर नियोजित प्लॉटिंग करून स्थानिक गरीब व गरजू यांना दिले असून याचा लाभ आदिवासी, बौद्ध व अन्य समाजाला देखील मिळाला आहे.

परंतु सदर दिलेल्या जागेपेक्षा पेक्षा अधिक जागा प्लॉट धारकांनी बळकावून अतिक्रमण केले आहे.आदिवासी समाजासाठी दिलेल्या आरक्षित जागेमध्ये देखिल अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले आहे. मोरबे धरणग्रस्त बाधित प्रकल्पग्रस्त यांनाही यातील जागा देण्यात आली आहे.तसेच अन्य लोकांनी काही जागा अडवून ठेवली आहे.या जागेवरील अतिक्रमण काढण्याबाबत शासनास अनेकवेळा पत्र व्यवहार, निवेदन देण्यात आले असून त्यावर कोणतीच कारवाई झालेली नाही, ही बाब लक्ष्यात घेण्यात यावी, अन्यथा लोकशाही मार्गाने आम्हास जावे लागेल, असे चौक माणिवली ग्रामस्थानी म्हटले आहे. याबाबत आपण जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे.

# तहसीलदार अभय चव्हाण यांच्याकडून टाटा स्टील फाऊंडेशनचे कौतुक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसिलदार अभय चव्हाण यांनी टाटा स्टील फाऊंडेशन, खोपोली कार्यालयास भेट देऊन तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला, आणि टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या कामाचे कौतुक केले.

तहसिलदार अभय चव्हाण यांनी टाटा स्टील फाऊंडेशन चे कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी टाटा स्टील फाऊंडेशनच्या पेहचान, रिश्ता (RISHTA) पोषण आणि दिशा (DISHA) या महत्त्वपूर्ण प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



खालापूर तालुक्यातील सुमारे १५ टक्के लोकसंख्या आदिवासी समाजाची असून कातकरी, ठाकूर आणि महादेव कोळी या अनुसूचित जमातींचा त्यामध्ये समावेश आहे. विशेषतः कातकरी जमात ही अतिशय मागास व दुर्बल आदिवासी गटात येते. या पार्श्वभूमीवर २०२२ मध्ये टाटा स्टील फाऊंडेशनने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात अनेक आदिवासी कुटुंबांकडे आवश्यक कागदपत्रांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर सुरू करण्यात आलेल्या पेहचान प्रकल्पा अंतर्गत २०२३ ते २०२६ या कालावधीत ३५ ग्रामपंचायतींतील ५७ आदिवासी वाड्यांमधील १७६४ जात प्रमाणपत्र प्रस्ताव प्रलंबित असल्याची माहिती देण्यात आली. यावर तहसिलदार यांच्याकडून जात प्रमाणपत्र प्रकिया जलद गतीने व्हावी यासाठी संबधित विभागाला सुचना करून आदेश देण्यात आले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी कर्जत यांच्या सहकार्याने तातडीने ७४८ प्रमाणपत्र तयार करण्यात आले असून सदर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. उर्वरित जात प्रमाणपत्र तयार करण्याचे काम चालू आहे.

याशिवाय RISHTA प्रकल्पाद्वारे किशोरवयीन मुलामुलींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर काम करण्यात येत आहे. अल्पवयीन विवाह रोखणे, किशोरवयीन मुलींमधील प्रजनन दर कमी करणे तसेच युवा परिवर्तनकर्त्यांचा गट तयार करणे ही या प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या अंतर्गत समुपदेशन, शिबिरे, शालेय स्पर्धा, युवक क्लब स्थापना, आरोग्य जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.

पोषण प्रकल्पाअंतर्गत महिलांमधील रक्तक्षय कमी करणे, ५ वर्षांखालील बालकांमधील कुपोषण दूर करणे, अंगणवाडी केंद्रांचे बळकटीकरण आणि संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे यावर भर दिला जात आहे. बालकांची आरोग्य तपासणी, अनेमिया चाचण्या, पोषण सखी प्रशिक्षण, परसबाग उपक्रम तसेच विविध जागरूकता कार्यक्रम या माध्यमातून काम सुरू आहे.

DISHA प्रकल्प म्हणजे महिलांना समाजात आणि निर्णय घेणाऱ्या संस्था/संस्थांमध्ये धोरणात्मक स्थान स्वीकारण्यासाठी तसेच त्यांच्या समुदायातील स्थानिक पातळीवर लिंग आधारित भेदभाव आणि लिंगविशिष्ट विकासासाठी प्रभावी आवाज उठवण्यासाठी त्यांना सक्षम करणे.

या महिला पंचायतीमधील बहिष्कृत कुटुंबांची ओळख करून त्यांना सामाजिक सुरक्षा सरकारी कार्यक्रम इत्यादींशी जोडून बदल घडवतील, लिंगविशिष्ट विकास आणि पंचायत स्तरावर लिंग समावेशी GPDP तयार करण्यासाठी ग्रामसभेत सहभागी होण्यासाठी महिलांना एकत्रित करतील. आतापर्यंत दोन वर्षांत एकूण २१५ महिलांनी या प्रकल्पात सहभाग घेतला आहे.



**श्रीवर्धनः मे महिन्याच्या कडक उन्हात समुद्र किनाऱ्यावर उंच उसळणाऱ्या लाटांमध्ये पोहण्याचा आनंद लुटताना लहान मुले.** (छाया : अमेय नाझरे)

# चौलमधील शिबिरातून विद्यार्थ्यांना मिळाली यशाची दिशा

**मुरुड : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणानंतरच्या करिअरच्या विविध संधींची माहिती मिळावी आणि त्यांच्या भविष्यास योग्य दिशा मिळावी या उद्देशाने दिलीप (छोटम) विठ्ठल भोईर चॅरिटेबल ट्रस्ट, झिराड आणि उत्कर्ष फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चौल चंपावती येथील पाठारे क्षत्रिय समाज सभागृहात करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. बेलोशी जिल्हा परिषद क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य दिलीप भोईर यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडताना स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींचा विचार करून निर्णय घेण्याचे आवाहन केले. योग्य मार्गदर्शनाच्या आधारे घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांच्या यशस्वी भविष्यासाठी महत्त्वाचा ठरतो, असे त्यांनी सांगितले.



डॉ. सचिन राऊळ यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाचा अनुभव सांगत विद्यार्थ्यांना मेहनत, जिद्द आणि पालकांच्या कष्टांची जाणीव ठेवण्याचा संदेश दिला. शालेय विद्यार्थ्यांनी मनापासून अभ्यासाचे नियोजन व आगामी काळ हे स्पर्धेचे युग असल्याने स्पर्धा परीक्षेची आवड ही शालेय जीवनातच लावून घ्यावी जेणेकरून आपण ही बाब सहज शक्य करू शकतो.जबाबदारी पूर्ण व कर्तव्यनिष्ठ या दोन बाबीचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांना कधीही अपयश येणार नाही असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

कार्यक्रमात प्रतीक सावंत आणि डिमेलो यांना आयटी कंपनीचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच उत्कर्ष फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत आयटी प्रशिक्षण, रोजगार सहाय्य आणि कौशल्य विकासाबाबत माहिती देण्यात आली. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरविषयीचा संभ्रम दूर होण्यास मदत झाली.

# आरसीबीचा धुव्वा

## हैदराबादचा ५५ धावांनी दणदणीत विजय



**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या हंगामातील आपल्या शेवटच्या लीग सामन्यात सनरायझर्स हैदराबादने रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरूविरुद्ध ५५ धावांनी शानदार विजय नोंदवला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने निर्धारित २० षटकांत २५५ धावांचा डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरात आरसीबीचा संघ २० षटकांत ४ बाद २०० धावांपर्यंतच मजल मारू शकला.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या सनरायझर्स हैदराबादची सुरुवात वादळी झाली. सलामीवीर ईशान किशनने अवघ्या ४६ चेंडूत ७९ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला अभिषेक शर्माची उत्तम साथ मिळाली. त्याने अवघ्या २२ चेंडूत ५६ धावा कुटल्या. त्यानंतर नेहमीप्रमाणे हेनरिक क्लासनने २४ चेंडूत ५१ धावा करत संघाला ४ बाद २५५ या विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले. आरसीबीकडून रसिक सलामने ४ षटकांत ५२ धावा देत २ बळी घेतले, तर कृणाल पांड्या आणि सुयश शर्मा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

दरम्यान, २५६ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना आरसीबीनेही कडवी टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पाटीदारने ३९ चेंडूत ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. व्यंकटेशने १९ चेंडूत ४४ धावा करत डावाला गती दिली. कृणाल पांड्याने ३१ चेंडूत ४१ धावांची नाबाद खेळी केली, परंतु हैदराबादच्या धावसंख्येचा डोंगर पार करणे आरसीबीला जमले नाही. त्यांचा डाव ४ बाद २०० धावांवर मर्यादित राहिला. हैदराबादकडून इशान मलिंगाने ३३ धावांत २ बळी घेतले. ट्रेव्हिस हेड, साकिब हुसेन यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# रायगड क्रिकेटच्या संघ बांधणीसाठी आरडीसीएचा टॅलेंट हंट

### २५० युवा खेळाडूंची चाचणी



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) तर्फे पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शनिवारी (दि. २३ ) आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या टॅलेंट हंट उपक्रमाला जिल्हाभरातील युवा क्रिकेटपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रायगड क्रिकेटच्या भविष्यातील संघ बांधणीसाठी गुणवंत खेळाडूंचा शोध घेण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात सुमारे २५० खेळाडूंनी नोंदणी करून सहभाग घेतला.

रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दडलेल्या क्रिकेट प्रतिभेला शोधून त्यांना जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय क्रिकेटच्या प्रवाहात आणण्याचा आरडीसीएचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला. आगामी काळात जिल्हा संघ अधिक मजबूत आणि स्पर्धात्मक बनविण्यासाठी लहान वयापासूनच खेळाडूंची निवड, प्रशिक्षण आणि घडण यावर भर देण्यात येत आहे. टॅलेंट हंट हा त्या दिशेने उचललेला महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या निवड प्रक्रियेत खेळाडूंच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण कौशल्याचे बारकाईने परीक्षण करण्यात आले. प्रत्येक विभागातील गुणवंत खेळाडूंची निवड त्यांच्या प्रत्यक्ष कामगिरीच्या आधारे तज्ज्ञ निवड समितीमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी माजी इंडिया 'ए' खेळाडू तथा महाराष्ट्र रणजी संघाच्या निवड समितीचे अध्यक्ष अक्षय दरेकर, माजी रणजीपटू पुष्कराज चव्हाण, योगेश पवार, माल्कम मॉंटेरो, रायगड संघाचे मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी तसेच एमसीए पंच व राज्यस्तरीय खेळाडू सागर मुळे यांनी प्रमुख निवडकर्ते म्हणून जबाबदारी सांभाळली.

निवड झालेल्या खेळाडूंसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि अधिकाधिक सामने खेळण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. या माध्यमातून खेळाडूंच्या कौशल्याला योग्य दिशा देऊन भविष्यात रायगड जिल्हा संघासाठी सक्षम खेळाडू घडविण्याचा आरडीसीएचा मानस आहे.

टॅलेंट हंट उपक्रमात हृषिकेश राऊत, संदीप जोशी, सागर कांबळे, मिहीर भाटकर, अभिजित रोहंदिया, विनय पाटील, रोहित कार्ले आणि सुनील सरगर यांनी निवड प्रक्रियेसाठी सहकार्य केले. तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, ॲड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, नरेंद्र मयेकर, भूषण मोरे आणि मनोहर अहिर यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू व पालक उपस्थित होते.

आरडीसीएच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याचे व्यासपीठ मिळाले असून, याच खेळाडूंमधून भविष्यात रायगड क्रिकेटचे नवे शिलेदार घडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वैभव सूर्यवंशीला कॉपी करणे मूर्खपणा

### देवदत्त पडिकलचे मत



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशीने आपल्या स्फोटक फलंदाजीने सर्वांची मने जिंकली आहेत. त्याने स्पर्धेत सर्वाधिक ५३ षटकार मारले. वैभवसाठी प्रत्येक गोलंदाज काहीतरी रणनीती घेऊनच मैदानात उतरते. वैभवने जसप्रीत बुमराहलाही सोडले नाही. त्याने त्याला पण पहिल्याच चेंडूवर सिक्स मारला आहे. वैभवचं जगभरात कौतुक होताना पाहायला मिळते. यातच आता आरसीबीचा स्टार फलंदाज देवदत्त पडिकलने वैभवबाबत एक गोष्ट बोलून दाखवली आहे.

वैभव सूर्यवंशी जे करतो ते खरोखरच अद्वितीय आहे. त्याच्या वयात, त्याच्या फलंदाजीतील ताकद आणि आक्रमकता खरोखरच उल्लेखनीय आहे. खरं सांगायचं तर, कोणीही त्याला कॉपी करण्याचा प्रयत्न करण्याचा प्रयत्न करत असेल मूर्खपणाचे ठरेल. तो एक रेअर टॅलेंट आहे आणि तो जे करतो ते अविश्वसनीय आहे. माझ्याबद्दल बोलायचं तर, मी माझ्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित करतो आणि माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करतो. मी स्वतःची इतरांशी तुलना करत नाही, कारण या स्पर्धेत अनेक प्रतिभावान खेळाडू आहेत. मी याकडे माझे ध्येय साध्य करण्याचा एक मार्ग म्हणून पाहतो.

देवदत पडिकलला वैभवची नाचक्की करायची नाही किंवा वैभवबद्दल त्याला नकारात्मकता पसरवायची नाही, पण इतर खेळाडूंनी केवळ वैभवचा खेळ पाहून खेळू नये असे त्याचे म्हणणे आहे. प्रत्येकाकडे विशेष टॅलेंट असते त्यामुळे केवळ वैभवसारखे खेळू नये तर आपली प्रतिभा ओळखून आपला खेळ तसा खेळावा, असे देवदत्त पडिकलचे म्हणणे आहे.

वैभव सूर्यवंशी आपल्या बॅटने आयपीएलमध्ये धुमाकुळ घालत आहे. वैभवने १३ सामन्यांमध्ये ४४.५३ च्या सरासरीने आणि २३६ पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने ५७९ धावा केल्या आहेत. सूर्यवंशीने एक शतक व तीन अर्धशतके झळकावली आहेत. वैभवने या हंगामात ५३ षटकार आणि ५० चौकार मारले आहेत. सूर्यवंशी ऑरेंज कॅपच्या शर्यतीत कायम आहे. तो शुभमन गिल व साई सुदर्शनच्या पुढे आहे.

# मैदानात विराट आक्रमक; हेडला दिली थेट वॉर्निंग


**हैदराबाद : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये झालेल्या सामन्यात हैदराबादने एकतर्फी विजय नोंदवला. या सामन्यात हैदराबादचा ५५ धावांनी विजय झाला. या सामन्यात मैदानात तापलेले वातावरण पाहायला मिळाले. विराट कोहली आणि ट्रॅव्हिस हेडमध्ये वाद रंगला. कोहलीने थेट हेडला वॉर्निंगही दिली. कोहलीचा आक्रमक अंदाज पुन्हा पाहायला मिळाला.

आरसीबी हा सामना हरली आणि कोहलीचे योगदान केवळ १५ धावांचे होते ज्या दरम्यान त्याचा हेडसोबत वाद झाला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने चार गडी गमावून २५५ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने विराट कोहली आणि व्यंकटेश अय्यर यांच्यासोबत डावाची सुरुवात केली. हैदराबादकडून शिवांग कुमार पहिले षटक टाकत होता.

# कृणालची बॉलिंग ॲक्शन काव्या मारनला खटकली

### स्टेडियममध्ये गंभीर आरोप



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरु व सनरायझर्स हैदराबादमध्ये सामना रंगला जो हैदराबादने एकतर्फी जिंकला. यात हैदराबादचा ५५ धावांनी विजय झाला. आरसीबीचा अष्टपैलू खेळाडू कृणाल पांड्याने टी-२० क्रिकेटमधील निर्भीड फलंदाजांचा सामना करण्यासाठी नवीन चेंडूने गोलंदाजीचा सराव केला. तो फलंदाजांना चकवण्यासाठी क्रीझचा वापर करतो, मागून गोलंदाजी करतो. बाउन्सर व यॉर्करसह सर्व प्रकारचे चेंडू टाकतो, पण आता कृणालवर कारवाई होऊ शकते, असे म्हटले जाते. २२ मेच्या सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या हाय-स्कोअरिंग सामन्यात त्याने फलंदाजांना रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. काव्या मारनने कृणालच्या गोलंदाजीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्याच्यावर 'चकिंग' केल्याचा आरोपही केला.

सामन्यादरम्यान जेव्हा कृणालने नितीश कुमार रेड्डीविरुद्ध वेगवान चेंडू टाकला, तेव्हा काव्या मारनने 'चकिंग' केल्याचा इशारा केला. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओत काव्या डावखुरा फिरकीपटू 'चकिंग' करत असल्याचे म्हणताना दिसत आहे. जेव्हा हेनरिक क्लासेन क्रीजवर आला तेव्हा चेंडू कृणालकडे सोपवण्यात आला. त्याने आपल्या पहिल्या षटकात एक षटकार दिला, पण क्लासेनला दोन डॉट बॉल टाकले व आठ धावा दिल्या. त्यानंतर त्याला गोलंदाजीवरून हटवून १७ वे षटक टाकण्यासाठी परत बोलावण्यात आले.

# हार्दिक पांड्यावर बीसीसीआयकडून कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध बुधवारी झालेल्या आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्याच्या वेळी बेल्स उडवल्यामुळे मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याला सामना मानधनाच्या १० टक्के दंड झाला; तसेच एका दोषांकाचीही शिक्षा झाली. क्रिकेट साहित्याचा अवमान केल्याबद्दल त्याच्यावर ही कारवाई झाली आहे.

डावाच्या दहाव्या षटकाच्या वेळी 'रन-अप'साठी परत जात असताना हार्दिकने यष्टींना जोरदार मारले. त्यामुळे बेल्स खाली पडल्या. यामुळे हार्दिकवर कारवाई करण्याचा निर्णय झाला. हार्दिकने त्याची चूक मान्य केली. आयपीएल नियमानुसार चार ते सात दोषांक झाल्यास खेळाडू एका सामन्यास मुकतो. दरम्यान, मुंबई इंडियन्सला बुधवारी मध्यरात्री संपलेल्या या सामन्यात हार पत्करावी लागली. हार्दिक खेळाडू म्हणूनही अपयशी ठरला. मोक्याच्या वेळी डावास स्थैर्य देणे त्याला जमले नाही.

# पराभवानंतरही आरसीबी पॉइंट टेबलमध्ये टॉपलाच



**मुंबई : प्रतिनिधी**


आयपीएलमधील ६७ वा सामना सनरायजर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरूमध्ये पार पडला. या सामन्यामध्ये हैदराबाद संघाने २० ओव्हरमध्ये २५५-४ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना आरसीबीचा संघ ५५ धावांनी हरला. रजत पाटीदार ५६ धावा, वेंकटेश अय्यर ४४ धावा आणि कृणाल पंड्याच्या नाबाद ४१ धावा सोडल्या तर इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही, पण हा सामना हरल्यावरही आरसीबी पॉइंट टेबलमध्ये पहिल्या स्थानावर राहिला आहे.

आरसीबी संघाचे १८ आणि आणि सनरायजर्स हैदराबादचे १६ गुण होते पण नेट रनरेट आरसीबीचा चांगला होता. त्यामुळे या सामन्यात हैदराबादला पहिल्या स्थानावर जाण्याची संधी होती मात्र तसे झाले नाही. सनरायजर्स हैदराबाद संघाने पहिल्यांदा बॅटिंग करताना २५५ धावा ठोकल्या होत्या. त्यामुळे आरसीबीला पहिल्या स्थानावर कायम राहण्यासाठी १७८ धावा करायच्या होत्या. या सामन्यामध्ये ट्रॅव्हिस हेड २६ धावा करून आऊट झाला. इशान किशन आणि अभिषेक शर्मा यांनी २६ चेंडूत ५२ धावांची भागीदारी करत पाया रचला होता. मात्र अभिषेक २२ चेंडूत ५६ धावा करत आऊट झाला. त्यानंतर आलेल्या क्लासेन याने इशानच्या साथीने ४८ चेंडूत ११३ धावांची मोठी भागीदारी करत संघाला मोठ्या धावसंख्येच्या दिशेने नेले. क्लासेन २४ चेंडूत ५१ धावा करून आऊट झाला. यामध्ये त्याने २ चौकार आणि ५ षटकार मारले. मात्र इशान किशन हटला नाही त्याने ४६ चेंडूंत ७९ धावांची दमदार खेळी केली.

आरसीबीचा फलंदाजीसाठी उतरल्यावर विराट व वेंकटेशने ६० धावांची सलामी दिली. मात्र मोठा फटका मारण्याच्या नादात ४४ धावांवर आऊट झाला. त्यानंतर विराटसुद्धा १५ धावांवर आऊट झाला. देवदत्त पड्डिकल २१ धावा, रजत पाटीदारने ५६ धावांची खेळी करत लढाई सुरू ठेवली होती. त्यासोबतच कृणाल पांड्याने ४१ धावा केल्या पण संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. पॉइंट टेबलमध्ये आरसीबी १८, गुजरात १८ आणि हैदराबाद १८ गुण आहेत.

# विक्रमापेक्षा खेळातील सुधारणेवर सचिनचे लक्ष

### जो रुटकडून कौतुक




**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक आहे. त्याने कसोटीत सर्वाधिक धावाही केल्या असून आता जवळपास दीड दशक होत आले तरी त्याचा हा विक्रम आबाधित आहे, मात्र त्याच्या विक्रमाच्या जवळ इंग्लंडचा क्रिकेटपटू जो रूट पोहचला आहे. त्यामुळे येत्या काही सामन्यांत तो सचिनचा विक्रम मोडू शकतो, असेही म्हटले जात आहे. आता यावर जो रुटने प्रतिक्रिया दिली आहे. रुटने सांगितले की, सचिनचे लक्ष नेहमीच विक्रमापेक्षा खेळात सुधारणा करण्यावर अधिक असते.

सचिन तेंडुलकरने १९८९ ते २०१३ या २४ वर्षांत कसोटी क्रिकेटमध्ये २०० सामन्यांत ५१ शतकांसह १५,९२१ धावा केल्या आहेत. तो सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा आणि धावा करणाराही खेळाडू आहे. त्याच्यापाठोपाठ असलेल्या जो रुटने कसोटीत १६३ सामन्यांत १३,९४३ धावा केल्या आहेत. त्याला सचिनचा विक्रम मोडण्यासाठी १९७९ धावांची गरज आहे. याबाबत जो रुट म्हणाला की, मला सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडण्याबाबत इतके वेळा प्रश्न विचारण्यात आला आहे की आता मी त्याकडे प्रयत्न करूनही दुर्लक्ष करू शकत नाही. सचिन तेंडुलकरने खेळासाठी जे काही केले आहे ते अनन्यसाधरण आहे. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा, माझ्यासाठी त्याच्याशी बोलणंच पुरेसं आहे. त्या खेळाडूने माझ्या जन्माच्या आधीच कसोटीत पदार्पण केले आहे आणि मी कसोटीत पदार्पण करण्यापर्यंत तो खेळत होता. तो इतके दीर्घकाळ खेळला आहे हेच खूप अविश्वसनीय आहे.

मला वाटते की मी शक्य तितके एकसंध आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहण्याचा प्रयत्न करतो. जेणेकरून प्रत्यक्ष सामने सुरू झाल्यावर मी तांत्रिक बाबी किंवा इतर कशाचीही चिंता करण्यापेक्षा डावपेच आखून समोर असलेल्या परिस्थितीनुसार खेळू शकेल. हे ऐकायला खूपच सोपं वाटत असेल पण मी जेव्हा क्रिजवर असतो तेव्हा मला फक्त सामने खेळायचे असतात, असेही रूट म्हणाला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com